# माणूस

शनिवार । ७ नोव्हेंबर १९७८
७५ पैसे

१७ मार्च १८८३...दुपारी दोन–अडीचची वेळ...लंडनमधली हवा कमालीची थंड... मधूनमधून झोंबरे वारे...धुके अद्यापही विरून गेलेले नाही...अशा वेळी डॉ. कार्ल मार्क्सची अंत्ययात्रा लंडनमधील हायगेट स्मशानभूमीच्या दिशेने चालली होती. अंत्ययात्रेत फक्त अकरा लोक, त्यातले अर्धेअधिक घरातलेच. बाकीचे सहकारी, म्हणजे अगदी घरातल्यासारखेच. बाहेरचे कोणी नाही!

मोकाट वाढलेले गवत तुडवीत, असंख्य शुभ्र कबरींना मागे टाकून हा घोळका स्मशानभूमीच्या एका उजाड कोपऱ्यात आला. तेथे जेनीची...मार्क्सच्या पत्नीची कबर नुकतीच उकरण्यात आली होती. तिचा ' मूर ' आता तिच्या सान्निध्यात कायमचा विसावणार होता. लाल रिबिनींनी सुशोभित केलेली मार्क्सची शवपेटिका भूमातेच्या पोकळीत व्यवस्थित ठेवण्यात आली. धार्मिक संस्कारांचा वगैरे काही प्रश्नच नव्हता. फक्त माती लोटून निघायचे होते. कोणाचे पाय हलत नव्हते. विवर्ण चेहऱ्याने सर्वजण खड्ड्याभोवती उभे होते. प्रार्थना करायची नव्हती; पण श्रद्धांजली वाहायची होती... त्यासाठी एंजल्स पाऊलभर पुढे सरकला........

**खिशातले कागद काढून**
**त्याने श्रद्धांजली वाचण्यास सुरुवात केली.......**

---

## डॉ. कार्ल मार्क्स : एक चरित्रकथा

---

**लेखिका : सुमती देवस्थळे**

---

## प्रसिद्धी : माणूस दिवाळी अंक

---

**साप्ताहिक माणूस**

वर्ष अठरावे–अंक एकोणिसावा

७ ऑक्टोबर १९७८

मूल्य ७५ पैसे

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :

**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव पेठ,

नागनाथ पाराजवळ

पुणे ४११ ०३०

दूरध्वनी : ४४३४५९

# सप्रेम नमस्कार

अर्थशास्त्रज्ञ कांता रणदिवे ह्यांची मुलाखत ( माणूस : १६ सप्टें. ) उल्लेखनीय वाटली. 'सवंग लोकप्रियता' आणि 'सरकारी आश्रय' ह्यांचा मोह टाळून परखड भूमिका विचारवंतांनी घेतली पाहिजे, हे त्यांचे म्हणणे सत्य आहे. फक्त गरज आहे ती अशी भूमिका आग्रहपूर्वक व आक्रमकरीत्या घेण्याची. त्यातून पुढे लोकप्रबोधन व लोकचळवळ उभी राहू शकेल – सध्याच्या मोकळ्या वातावरणात हे शक्य आहे. 'माणूस' अशा चळवळीला व्यासपीठ देऊ शकतो, निदान कांता रणदिवे ह्यांसारख्या लोकांना एकत्र आणून एक नवीन प्रक्रिया सुरू करणे शक्य आहे – एकदा जर तिची नीट सुरवात झाली तर मग अंगभूत सामर्थ्यावर ती सतत पुढेच जाईल.

तात्कालिक व व्यावहारिक यशापयशाचा विचार 'माणूस' करीत नाही, म्हणून ह्या ओळींचा प्रपंच.

२० सप्टेंबर सुहास बाक्रे, ठाणे

देवरुख म्हणजे सदैव गतिमान असलेल्या एका जगापासून बरेचसे एकाकी पडलेले एक खेडेवजा गाव ! अशा गावातलं एकसूत्री कंटाळवाणे जीवन जगताना स्वतःलाच एक न जाणारा गंज पडेल अशी भीती वाटत राहाते; पण ह्या वाळवंटातून देखील 'माणूस' सारखी 'ओअॅसिस' 'कारवाँ' पुढे रेटायला बळ देतात. कारण 'माणूस' नाटच-चित्र-राजकारण-साहित्य कला या सगळ्या रंगीबेरंगी, कडू–गोड जगातल्या ताज्या आणि अर्थपूर्ण हालचाली अत्यंत नेटकेपणे आमच्यापुढे साक्षात ठेवीत असतो आणि त्यामुळेच बाहेर कुठं गेलं तर आम्ही अगदीच 'गावठी वाण' ठरत नाही.

इथे राहून देखील आम्ही 'शब्दप्रधान गायकी'चा रंगलेला प्रकाशनसोहळा अनुभवू शकतो. थिएटर देखील नसलेल्या देवरुखमध्ये राहूनदेखील एखाद्या मित्राला 'द वन हू फ्लू ओव्हर ककूज् नेस्ट' आवर्जून बघायला कळवितो. भविष्यात बघायला न मिळणाऱ्या 'तीन पैशांचा तमाशा'बद्दल काही बोलू शकतो. हे सगळं केवळ 'माणूस'च्यामुळेच. कधी तरी कृतज्ञता व्यक्त करायची होती ती आज केली एवढंच.

तुमच्या विशेषांकांच्या देखण्या परंपरेला दृष्ट लागू नये म्हणूनच तुम्ही 'राजकपूर विशेषांका'ची काळी तीट लावलेली असावी बहुधा – असो, असो.

एकंदरीत तुम्ही 'स्पोर्टस्'ला कमी वाव देता असं वाटतं. राशी–भविष्याला फाटा दिला ही अगदी अभिनंदनीयच गोष्ट ! भारीच प्रकार वाटला होता तो आपल्याला. तर विनंती ही की, मधून मधन 'चंदेरी दुनिये'तून 'मैदानात' उतरायला हरकत नाही.

सदानंद बोरसे पहिल्यांदा जरा 'हे'च वाटले होते; पण आज–काल ते शिरीष काणेकरांची 'याद' फारशी येऊं देत नाहीत. विनय, शिरीष या नावाची माणसं फार 'ग्रेट' असावीत. हा तुमचा अनुभव आहेच म्हणा !

'माणूसचं पान न् पान वाचनीय असतं अंक घरी सर्वांनाच आवडला', इ. इ. गुळगुळीत बोलायला मला आवडत नाही; पण एवढंच स्वानुभवाने सांगेन की, शनिवारी 'माणूस' आला नाही तर बुधवारची 'सरगम' चुकल्याइतकं फील् होत राहाते.

पत्राचं 'चुइंगम' झाल्याचे अगदी मनापासून कबूल करतेय्.

२२ सप्टेंबर सुरेखा जोशी, देवरुख

□ आपल्या २३ सप्टेंबरच्या अंकात 'ताजमहाल : यमुनाकाठी की यमद्वारी' ह्या लेखात श्री. शिरीश सहस्रबुद्धे लिहितात-- 'या रिफायरीतून बाहेर सोडल्या जाणाऱ्या दूषित वायूंपैकी एक 'सल्फर-डाय-ऑक्साइड' असणार आहे. आता रसायनशास्त्राचं प्राथमिक ज्ञान असणाऱ्या एखाद्या शाळकरी पोरालासुद्धा हे कळेल की, सल्फर-डाय-ऑक्साइडचा पावसाच्या पाण्याशी 'संयोग झाला की, तीव्र सल्फ्यूरिक ॲसिड-गंधकाम्ल-बनेल-म्हणजे यापुढे ताजवर पावसाळ्यात वर्षाव होईल तो साध्या पावसाचा नव्हे, अनेकदा त्याला गंधकाम्लाच्या 'शॉवर बाथ' ची जळती चव चाखायला मिळेल."

थोडक्यात हळूहळू ताजमहालचे सफेद दगड विरघळतील.

ही तक्रार अत्यंत खरी आहे; पण ह्या तक्रारीतच उपाय स्पष्ट आहे. तो असा की रिफायनरीच्या कारखान्यालाच जोडून बाहेर सोडले जाणारे सर्व वायू-पाल्याच्या टाक्या करून त्यांतच सोडावे, म्हणजे मोफत सल्फ्यूरिक ॲसिडचा कारखाना मिळाला व ताजमहालही वाचला.

तरी मथुरेतील लोकांनी, ह्या कारखान्याला असे लोकोपयोगी कार्य करायला भाग पाडावे व त्यात कारखान्याचाच फायद आहे.

सप्टेंबर २७ डॉ. शंकर हरी मराठे,
मुंबई-४.

□ मी एक मध्यमवर्गीय मुसलमान आहे व माझी मातृभाषा उर्दू आहे. मराठी भाषेचा पण मी चहाता आहे. भाषेमध्ये चुका होण्याची शक्यता आहे, तरी राग मानू नये. मी आपणास अपरिचित आहे; पण तुम्हाला पत्र लिहिण्याचे धाडस करीत आहे. मी 'माणूस' चा जवळजवळ १९६३ पासून वाचक आहे. 'माणूस' चे सडेतोड लेख व वाचनीय सदरे मला फार आवडतात.

आपला आताचा 'माणूस' चा कुटुंब नियोजन अंक वाचला. तो मला फार आवडला. धन्यवाद ! आपल्या विचारांशी मी शंभर टक्के सहमत आहे. श्री. परुळकरसारख्या इंटर नॅशनल कीर्तीच्या माणसाने या विषयावर लिहिले तरच लोकमत बदलता येईल. त्यांनी जे मुस्लीम देशाबद्दल लिहिलं ती सर्व हकीकत खरी आहे. सर्व जगाला आता कुटुंब नियोजनाचे अर्थ चांगले कळू लागले आहेत. उगीच धर्माच्या नावाखाली कोणीही अडेलतट्टूपणा करू नये. जर इराणमधील-एका मुस्लिम राष्ट्रामधील-एक म्हातारा मनुष्य नियोजनाच्या मताबद्दल जे म्हणू शकतो ते मी आपल्याला फारसी भाषेमध्ये लिहून दाखवितो.

'खानम खल्याल शुमा सही' असा त्याचा अर्थ होतो. ( तुम्ही म्हणता ते बरोबर आहे ). हे जर एका इस्लामी राष्ट्रातील विचार, तर तेच भारतामधील मुस्लिमांना अंमलात आणण्यास काय हरकत आहे ? पण आता हे सांगणार कोण ? त्याला उपाय एकच, श्री. परुळकरसारख्या जागतिक कीर्तीच्या माणसाने या विषयावर राष्ट्रीय संकट म्हणून विचार केला पाहिजे व तो लोकांना पटवून सांगितला पाहिजे. 'माणूस' चे पण अभिनंदन !

१४ सप्टेंबर महंमद सादिक नालबंद,
आपटा.

# कुटुंब-नियोजन

## "संख्यात्मक बाजूइतकीच शस्त्रक्रिया निर्दोष होणे महत्त्वाचे !"

## आरोग्यमंत्री डॉ. प्रमिला टोपले यांची मुलाखत

## माणूस : पुढील अंकी

# अवती-भवती

शिरीष सहस्रबुद्धे

## □ काही मुख्यमंत्री आणि दोन प्रश्नचिन्हे

पंतप्रधानांनी मुख्यमंत्री-परिषद बोलावणं ही काही नव्यानं पडलेली प्रथा नव्हे; पण गेल्या आठवडयात बोलावली गेलेली मुख्यमंत्री-परिषद मात्र एरवीपेक्षा काहीशी वेगळी ठरणारी होती खरी. अर्थात त्याचं कारण, देशातल्या ज्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर ही बैठक भरत होती, ती प्रश्नचिन्हांकित परिस्थिती हेच होतं. चर्चा अनेक प्रश्नांवर झाली असली, तरी परिषदेचा मुख्य विषय–पंतप्रधानांच्या भाषणातूनही स्पष्ट झाल्याप्रमाणे – 'कायदा आणि सुव्यवस्था' ही दोन प्रश्नचिन्हं आणि त्यांची सोडवणूक, हाच होता. कारण सर्वत्र सारं काही आलबेल असल्याचा आभास वरकरणी कुणी कितीही निर्माण केला, तरी कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नाच्या आघाडीवर परिस्थिती दिवसानुदिवस अधिकाधिक चिंताजनक होत चालली आहे, हे कुणी नाकारू शकत नाही. ही व्यापक समस्या आणि तिचे विविध मुद्दे–घटक–विभाग यांचे दुवे– 'Link' –जुळवायचं काम या आठवडयात अनेक नियतकालिकांतून चांगल्या तऱ्हेनं करण्यात आलेलं आहे.

जनता पक्ष अधिकारावर आल्यानंतर आणीबाणीची प्रतिक्रिया म्हणून एक सूक्ष्म ढिलाई वातावरणात / शासनात निर्माण झाली आणि त्यातूनच कायदा व सुव्यवस्थेची समस्या ( लॉ अँन्ड ऑर्डर प्रॉब्लम ) हळूहळू विकसित होत गेली, हा आलेख आता स्पष्ट झालाच आहे. २४ सप्टेंबरला मुख्यमंत्रीपरिषदेत, आजवर नाकारल्याच जाणाऱ्या या समस्येच्या अस्तित्वाला उघडपणे तोंड फुटलं, इतकंच काय ते. संपूर्ण देशाच्या संदर्भात बोलताना हरिजनांवरचे वाढते अत्याचार हा तर आंध्र प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगालबद्दल विशेषत्वानं बोलताना नक्षलवाद्यांच्या वाढत्या कारवाया हा चर्चेचा केंद्रबिंदू होता. दलितांवरच्या अत्याचारांचं कठोरपणे निर्मूलन करण्याचं आदेशात्मक आवाहन पंतप्रधानांनी समारोपाच्या भाषणात स्पष्टपणेच केलं; पण दलितांइतकीच भूमिहीनांच्या असंतोषाचीही तीव्रता जाणवते आहे–जाणवणार आहे. सरकारच्याच आकडेवारीनुसार एकूण जादा जमिनीपैकी फक्त दोनतृतियांश एवढीच जमीन, जमीनदारांनी प्रामाणिकपणे जाहीर केलेली आहे; त्यातली जेमतेम निम्मीच एव्हाना सरकारनं ताब्यात घेतलेली आहे आणि त्यापैकी प्रत्यक्षात भूमिहीनांच्या पदरात पडलेल्या जमिनीचं प्रमाण तर अगदीच नगण्य आहे. साहजिक याविरुद्धचा असंतोष, जमीनदारीचं प्राबल्य असणाऱ्या वरील तीन राज्यांत खदखदतो आहे. नक्षलवाद्यांच्या वाढत्या कारवाया अशा असंतोषातूनच उद्भवल्या आहेत. भूमिसुधार कायद्यांची त्वरेने अंमलबजावणी करण्याचे आदेश आता राज्यांना सुटलेले असले, तरी जनता पक्षांतर्गत प्रभावी असणारी, श्रीमंत शेतकरी व बडया जमीनदारांची बळकट लॉबी झारीच्या तोंडातल्या शुक्राचार्यांची भूमिका बजावल्यावाचून कशी राहील ? पुन्हा राज्यशासनं ही अशा एखाद्या लॉबीच्याच मुठीत असल्यामुळं ( उदाहरणार्थ : महाराष्ट्रात परवापरवापर्यंत सत्ताधीश असणारी आणि अजूनही कमी प्रभावी नसलेली शुगर लॉबी ! )त्यांचं पोलिसदल हेही एक तर थेट अत्याचारी–हितसंबंधी गटांचीच पाठराखण करण्याची किंवा निदान मौजबघ्यांची भूमिका वठवीत असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळं होतं असं की, इंदिरा काँग्रेसच्या हातातल्या आंध्र प्रदेशात काय किंवा जनता पक्षाच्या ताब्यातल्या बिहारात काय, पोलिसांच्या जास्तीत जास्त लाठया पडतात, त्या आपल्या न्याय्य हक्कांची मागणी करणाऱ्या दलित/भूमिहीनांच्याच मोर्चावर–कारण त्यांच्या संघर्षशीलतेला हिंसेचा मुलामा देणं सहजसाध्य असतं. त्यांना संघर्षाला प्रवृत्त–प्रक्षुब्ध करणारे मात्र सुरक्षित नामानिराळं राहतात. डाव्या कम्युनिस्टांचं कुरण बनलेल्या पश्चिम बंगालमधली अवस्था याहून फार बरी आहे, असं नव्हे.

बंगालमधलंच उदाहरण घेऊ. पश्चिम बंगालच्या पश्चिम भागातला बांकुरा जिल्हा. इथल्या नक्षलवाद्यांच्या वाढत्या उपद्रवाला आळा घालण्यासाठी सरकारनं काय करावं ? तर आपल्याच पक्षाच्या निमलष्करी संघटनेला त्यांनी या विभागात मोकळं सोडलंय, अशी बातमी आहे आणि तिथल्या मार्क्सवादी–लेनिनवादी कम्युनिस्ट पक्षाच्या ( नक्षलवाद्यांमधल्या एका लहान गटाचं अधिकृत नाव ) नेत्यांची तक्रार अशी आहे की, हिंसक कृत्यांशी कोणताही संबंध नसलेले त्यांचे सातशे निरपराध कार्यकर्ते आजवर अकारणच तुरुंगात डांबले गेले आहेत. या सगळ्याची पार्श्वभूमी अशी की, पोलिसांकडून किंवा अशा निमलष्करी संघटनांकडून होणाऱ्या राजकीय कार्यकर्त्यांच्या छळाविरुद्ध पश्चिम बंगालमधल्या सर्वच डाव्या पक्षोपपक्षांनी पूर्वी आवाज उठविला आहे. त्यांचंच एक दृश्यफल म्हणजे गेल्या वर्षी डाव्या कम्युनिस्टांचं मंत्रिमंडळ ज्योति बसूंच्या नेतृत्वाने अधिकारारूढ होताच सर्व राजकीय स्थानबद्धांची–नक्षलवाद्यांसह–सरसकट मुक्तता करण्यात आली व त्यांचं स्वागतही खूप झालं. नक्षलवाद्यांमधले काही गट आणि डाव्या कम्युनिस्टांची युती होऊन काही राज्यांत तरी भक्कम डावरी फळी उभी राहील, असा रंग दिसू लागला होता. ते तर झालं नाहीच, पण अलीकडच्या काही महिन्यांत सत्तारूढ डाव्या कम्युनिस्टांचं नक्षलवाद्यांबद्दलचं धोरण बदलत आहे, अशी शंका घेण्यात येत आहे. नव्यानं स्थानबद्ध करण्यात आलेल्या नक्षलवादी कार्यकर्त्यांना तुरुंगात सतावण्यात आल्याची तक्रार आहे. मृणाल दास आणि देवाशिष या दोघा नेत्यांचो

पृष्ठ २४ वर

मुंबई वार्ता

विनय सहस्रबुद्धे

## □ ठाण्यातील लघुउद्योजकांची परिषद

ठाणे जिल्ह्यातील लघुउद्योजकांची एक परिषद अलीकडेच ठाण्यात पार पडली. सरकारच्या बदलत्या औद्योगिक धोरणामुळे हळूहळू लघुउद्योगांना वाव मिळत आहे. जनता सरकारने जिल्हा उद्योगकेंद्र अस्तित्वात आणून नव्या लघुउद्योजकांना फार मोठा दिलासा दिला आहे. एखाद्या सामान्य मध्यमवर्गीय सुशिक्षित तरुणाने बँकेकडून कर्ज मिळवून एखादा लघुउद्योग सुरू करायचा निर्णय घेतला तर, तो प्रत्यक्ष सुरू होण्यापूर्वी किमान ३९ सरकारी कचेऱ्यांमधून ४०५ प्रमाणपत्रं मिळवून तो त्याला दाखल करावी लागत. लघुउद्योगाचं नावदेखील न घणाऱ्या कुणाही सामान्य तरुणाला साधा उत्पन्नाचा दाखला मिळवायचा तरी कोण धावपळ करावी लागते! तेव्हा, लघुउद्योग सुरू करा असा प्रचार करणं सोपं असलं तरी प्रत्यक्ष लघुउद्योग काढणं हे येरा-गबाळयाचं काम नाही. अशा परिस्थितीत जिल्हा उद्योगकेंद्रामुळे नव्या आणि जुन्या अशा सर्वच लघुउद्योजकांचा मोठाच लाभ झाली आहे.

ठाणे जिल्ह्यातील सर्व लघुउद्योजकांच्या समस्यांवर सांगोपांग चर्चा व्हावी आणि प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने नीट विचार व्हावा या उद्देशाने जिल्हा लघुउद्योग संघटनेनं एक परिषद आयोजित केली होती. राज्याचे मजूरमंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी या परिषदेचं उद्घाटन केलं. सुरुवातीलाच अंबरनाथ, वसई, बदलापूर, मुरबाड, पालघर, डहाणू, वाडा, कल्याण इ. ठिकाणांहून आलेल्या लघुउद्योजकांनी आपल्या भागातील उद्योगविषयक समस्यांबद्दल संक्षिप्त निवेदन सादर केली. परिवहनाच्या गैरसोयी, वीज व पाणी यांची टंचाई, कच्च्या मालाचा पुरवठा, जकात इ. अनेकविध समस्यांवर या निवेदनांमधून चांगलाच प्रकाश पडला. विशेषतः वाडा, डहाणू या भागातील उद्योजकांना अनेक बिकट प्रश्नांना तोंड द्यावं लागतं.

या परिषदेत लघुउद्योजकांपैकीच काहींनी तयार केलेले, कच्च्या मालाचा पुरवठा, वित्तसहाय्य, बाजारपेठा, आयात-निर्यात या विषयावरील अभ्यासपूर्ण निबंधही सादर करण्यात आले.

केंद्रीय उद्योगमंत्री श्री. जॉर्ज फर्नांडीस आणि राज्याचे उद्योगमंत्री श्री. सुंदरराव सोळंके हे दोघेही या परिषदेला उपस्थित होते. श्री. सोळंके यांनी आपल्या भाषणात लघुउद्योजकांच्या अनेक समस्यांचा ऊहापोह केला. नव्या उद्योजकांना शक्य तितक्या लवकर वित्तसहाय्याची रक्कम देत जा, असे आदेश आपण सरकारी महामंडळांना दिले आहेत, असं त्यांनी सांगितलं. राज्य सरकार लघुउद्योजकांच्या निर्यातविषयक गैरसोयी दूर करील, असं आश्वासन देऊन ते म्हणाले की, या परिषदेत उपस्थित केलेले सर्व प्रश्न येत्या दोन महिन्यात सोडविण्याचा राज्यशासनाचा विचार आहे. वेळेचं बंधन घालून घेण्याची सोळंकेसाहेबांची पद्धत स्वागतार्ह आहे; पण ती प्रत्यक्ष अंमलात आली तरच!

केंद्रीय उद्योगमंत्री श्री. जॉर्ज फर्नांडीस यांचं या परिषदेतील भाषण विशेष लक्षवेधी ठरलं. 'शहरांकडून गावाकडे, बड्या उद्योगांकडून छोट्या उद्योगांकडे, यंत्रशक्तीकडून मानवी शक्तीकडे' ही नव्या औद्योगिक धोरणाची त्रिसूत्री आहे, हे श्री. फर्नांडीस यांनी प्रारंभीच स्पष्ट केलं. या धोरणाच्या अंमलबजावणीचं उदाहरण देताना ते म्हणाले की, पूर्वी लघुउद्योगक्षेत्रासाठी केवळ १८० वस्तूंचं उत्पादन राखून ठेवण्यात आलं होतं. आज मात्र ही संख्या ८०७ वर गेली आहे. जनता सरकारच्या या धोरणामुळे बडे उद्योग आपल्यावर नाराज आहेत, असं सांगून ते म्हणाले की, या बड्यांशी संगनमत करून पूर्वीच्या राजवटीने भारतात विकासाचं नव्हे, तर टंचाईचं अर्थशास्त्र राबविलं. सरकारी क्षेत्रात सिमेंटचे कारखाने मोठ्या प्रमाणावर काढले गेले नाहीत म्हणूनच आज सिमेंटची टंचाई जाणवत आहे. टंचाईची परिणती भाववाढीत होते व कमी श्रमात व्यापारी व कारखानदार अव्वाच्या सव्वा नफा कमावतात. गेल्या चाळीस वर्षांत मुंबईची प्रचंड वाढ झाली; पण बोटींसाठी पूर्वी होत्या त्याच तीन गोद्या आज आहेत व म्हणूनच समुद्रात जहाजांची कोंडी होत आहे.

'लघुउद्योजकांनी लघूत्तम उद्योजकांचाही विचार केला पाहिजे. आपल्या उद्योगाची वाढ होताना आपल्यावर अवलंबून असलेले अन्य लघुउद्योग भरडले जाणार नाहीत, याची काळजी लघुउद्योजकांनी घेतली पाहिजे.' मंत्रिमहोदयांचे हे विचार मननीय आहेत. उदाहरणासह आपलं म्हणणं मांडताना ते म्हणाले की, कचेऱ्यांमधून लोखंडी किंवा प्लॅस्टिकचे ट्रे (कागदपत्रांसाठी) वापरण्याऐवजी जर वेत-बांबूपासून बनविलेले ट्रे वापरले तर, ग्रामीण उद्योजकांना वाव मिळेल.

बँका आणि सरकारी कचेऱ्यांच्या रामरगाड्यात लघुउद्योजकांची कुचंबणा होते याची आपल्याला जाणीव असल्याचं श्री. फर्नांडिस यांनी सांगितलं. याच समारंभात वैद्य नावाच्या मूक-बधिर तरुण कलावंताने श्री. फर्नांडिस यांना आपली चित्रे व तक्रारीचे निवेदन सादर केले होते. या घटनेचा उल्लेख करून ते म्हणाले की, या दुर्दैवी तरुणाला आपला लघुउद्योग सुरू करताना बँकांच्या धोरणामुळे जे कष्ट पडले त्यामुळे उडू पहाणाऱ्या एका पक्षाचे पंख निर्दयपणे छाटले गेले आहेत. सरकारी कार्यालयात काम कसे चालते याचा हा पुरावा माहितीसाठी आपण सर्व सहकारी मंत्र्यांना पाठवू.

परिषदेच्या अध्यक्षस्थानी खासदार रामभाऊ म्हाळगी होते. ही परिषद आयोजित करण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. शेतकऱ्यांचा मित्र असलेल्या बेडकांची निर्यात थांबवावी यापासून मध्य-रेल्वेच्या लोकल वाहतुकीतील सुधारणेपर्यंत अनेक प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली आहे. लोकसभेच्या अधिवेशनानंतर मतदारांना कामगिरीचा अहवाल देण्याची एक चांगली प्रथा त्यांनी पाडली आहे. मुख्य म्हणजे ठाण्यातील समाजवादी व जनसंघ गटात सवर्ष टाळण्यात ते यशस्वी ठरले आहेत.

लघुउद्योजकांच्या या परिषदेतच, खास लघुउद्योगक्षेत्राच्या मदतीसाठी एक स्वतंत्र बँक स्थापन करण्याचा केंद्र सरकार विचार

पृष्ठ २३ वर

# आम्ही संशोधिलेले नवे

# ' प्रधानमंत्री ' जातक

ग्यानबा

जातक हा एक धर्मग्रंथ आहे.

आपआपल्या मर्यादा ओळखून स्थूल व्यवहारापलीकडे नजर टाकायला तो साऱ्यांना सांगतो.

' जातक ' याचा अर्थ 'जन्माची हकीकत ' असा होतो.

बोधिसत्त्वाच्या पूर्वजन्मीच्या या कथा आहेत. याला ' अतीतकथा ' म्हणतात.

ही सांगण्यापूर्वी ' वर्तमानकथा ' येते.

शेवटी दोन्ही कथातल्या पात्रांची सांगड घालून फोड केलेली असते.

–दुर्गा भागवत
' सिद्धार्थ जातक '
खंड पहिला, प्रस्तावना

पूर्वी काशी राज्यात ब्रह्मदत्त नावाचा राजा राज्य करीत असे. पौरजनांच्या संमतीने तो नेहमी प्रधानमंत्री नेमीत असे. जो कुणी प्रधानमंत्री असेल त्याचा सदैव जयजयकारच करायचा, असा पौरजनांचा समज होता. प्रधानमत्री हा गुणी व सर्वज्ञ आहे, असा डंका सर्वत्र पसरला, की राज्यावर कितीही संकटे आली तरी प्रधानमंत्री बदलण्याचा विचार कुणाच्याही मनात येत नसे.

सत्तेवर असलेला प्रधानमंत्री वृद्धापकाळाने मरण पावला तरच प्रधानमंत्री बदलण्याचा प्रसंग काशीराज्यावर येतो, अशी त्याची जगभर ख्याती पसरली होती.

यामुळे व्हायचे असे की, मंत्रिमंडळातील सर्व ' भिक्षू ' व ' थेर ' ( वृद्ध ) प्रधानमंत्र्याच्या महानिर्वाणाची मार्गप्रतीक्षा करीत असत. त्या त्या काळातील हटवादी वृद्धांना ' थेर ऑफ दि डे ' या अर्थाने थेरडे म्हणण्याचा परिपाठ पडला असावा. अर्थात हे सर्व मनातल्या मनात चाले. एकदा ब्रह्मदत्ताचा प्रधानमंत्री मोरसुंभ, ह्या ' अमर-इका ' देशात सरकारी भेट देण्यासाठी गेला असता, तिथे तो आजारी पडल्याचे वृत्त आले. वृद्धावस्थेत असूनही ' मोरा ' प्रमाणे डौलदार व सुंभाप्रमाणे पीळदार असलेला मोरसुंभ आता कसचा परत येतो, या कल्पनेने मंत्रिमंडळातील सर्व भिक्षू गटागटाने, पुढल्या प्रधानमंत्र्याचा विचार करू लागले. सर्वांची विचारशक्ती अतिशय उत्तम असल्याने लवकरच विचारविनिमय संपून सर्वजण हमरीतुमरीवर आले ! त्यांच्या भांडणाचे आवाज राजवाड्यात ब्रह्मदत्ताला रोज ऐकू येऊ लागले.

ब्रह्मदत्ताच्या पदरी चुल्लक नावाचा एक पंडित होता. ब्रह्मदत्ताने चुल्लकाला बोलावून विचारले–

' चुल्लका, हे सर्व मंत्री, पौरजनांची कामे न करता कशाकरिता भांडत आहेत ? '

चुल्लकाने मग ब्रह्मदत्ताला वस्तुस्थिती सांगितली की, प्रधानमंत्री मोरसुंभ आता काही परत येणार नाही, या कल्पनेने सर्वजण भांडत आहेत. हे सांगून चुल्लकाने राजाला एक गाथा ऐकविली–

नद्या सर्व वक्रगती,
रानी सारीच लाकडे ;
येता संधि मंत्री,
होती सगळेच नागडे

ब्रह्मदत्त सचित झाला. पौरजनांना काय वाटेल, या विचाराने त्याची झोप उडाली. तेव्हा चुल्लक राजाला म्हणाला–

' पौरजनाना काहीही वाटणार नाही. पूर्वीही असे घडलेले आहे. '

असे म्हणून चुल्लकाने शास्त्याने जेतवनात सांगितलेली कथा राजाला ऐकविली–

पूर्वी अवंती राज्यात मठ्ठ नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला शिकारीचा भारी नाद. प्रधानमंत्र्याला घेऊन तो एकटा शिकारीला निघाला. प्रासादातून निघताना त्याने प्रधानमंत्र्यांना विचारले–

'प्रधानजी, पाऊस पडणार की काय ? क्षितिजावर एखादा चुकार काळा अभ्रखंड दिसतो आहे ! '

प्रधानाने सांगितले–

' शक्य नाही महाराज. हवा फारच छान आहे. '

दोघे जेतवनाच्या दिशेने निघाले. वाटेत त्यांना चरणदास नावाचा एक शेतकरी भेटला. तो राजाला म्हणाला–

' महाराज,शिकारीला निघालात वाटतं ? पण आज कुठली शिकार ? आज चांगलाच पाऊस पडणार आहे. '

राजा व प्रधान मनात म्हणाले, हा काही तरी सांगतो आहे. ते तसेच चालत राहिले. जंगल लागले मात्र आणि पाऊस सुरूच झाला. शिकार न करताच दोघे राजवाड्यात परतले. राजाने लगेच चरणदासाला बोलावणे धाडले. चरणदास दरबारात आला. मठ्ठ राजा त्याला म्हणाला–

' आजपासून तुम्ही आमचे प्रधानमंत्री ! तुमच्या विद्वत्तेने आम्ही प्रभावित झालो आहोत. '

प्रधानमंत्री म्हणून चरणदास रुजू झाल्यावर मठ्ठानं विचारले–

' आता सांगा–त्या दिवशी तुम्ही पाऊस पडणार हे कसे काय जाणलेत ? '

चरणदास म्हणाला–

' महाराज, पाऊस पडायचा असला की माझ्या राजू गाढवाचे कान फिरतात. कानाच्या पाळचा आत मुडपून तो टोके पुढे करतो. तो खरा ज्ञाता आहे. '

महाराजांनी तत्क्षणी चरणदासाला काढून त्याचे जागी त्याच्या राजू गाढवाला प्रधानमंत्री केले.

गोष्ट ऐकल्यावर ब्रह्मदत्त हसू लागला. तेव्हा चुल्लक म्हणाला–

' तेव्हापासून सर्व गाढवांना आपण प्रधानमंत्री व्हावेसे वाटते. '

□

# मराठवाडा वार्तापत्र : विरगावची लोकसमिती

निशिकांत भालेराव, औरंगाबाद

औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूरच्या जवळच एक गाव आहे. सर्व-सामान्य गावाप्रमाणेच त्यांची गुणवैशिष्टचे आहेत. वैजापूरहून २० कि. मी. अंतरावर हे गाव वसलेले. गावाचे नाव वीरगाव. नावाप्रमाणेच अनेक शूर वीर गावात आहेत. काही चांगले, काही वाईट. वीरगावची लोकसंख्या पाच हजार. आणीबाणीनंतर लोकसभेच्या निवडणुका झाल्या. सुभाष लोमटे या युक्रांदच्या कार्यकर्त्याला वैजापूर तालुक्यात प्रचार करताना वीरगावची काही पोरं दिसली. सुभाषने त्यांना लगेच कामास लावले. जयप्रकाश नारायण यांच्या 'लोकसमित्यांचे जाळे उभारा' या संपूर्ण क्रांतीच्या एका आवाहनास युक्रांदने प्रतिसाद दिला. अनेक ठिकाणी लोकसमित्या स्थापन झाल्या. वीरगावलासुद्धा एक लोकसमिती स्थापन झाली. गावातील तरुण मुलांचा उत्साह. त्यात सतत दुष्काळामुळे दैन्यावस्था असलेली, आजपर्यंत अन्याय, अत्याचार निमूटपणे सहन करीत आलेली जनता निर्भयपणे जीवनातील मूलभूत प्रश्नांना हात घालणाऱ्या 'लोकसमितीच्या' तरुणांकडे आशेने पाहू लागली. त्यांच्या हाकेला ओ देऊन प्रश्न सोडविण्यासाठी एकत्र येऊ लागली, संघटित होऊ लागली. वाचनालय सुरू झाले. रोज एखाददुसरे वर्तमानपत्र येऊ लागले. त्यातील बातम्यांचे, अग्रलेखांचे जाहीर वाचन सुरू झाले. Information is Power हा संपर्कशास्त्रातील मॅकलूहनचा विचार वीरगावामधील पोरांना उमगला. गावात नवे वारे वाहू लागले.

छोट्या-मोठ्या अनेक प्रश्नांवरील लढ्यांमधून आज लोकसमिती संघटित होत आहे. रोजगार हमी योजनेत काम मिळविणे, त्यातील भ्रष्टाचार रोखणे, या संघर्षातून गावकऱ्यांचा लोकसमितीवर विश्वास वाढत गेला. सासू–सुनेच्या भांडणापासून मुलीवरील बलात्काराच्या तक्रारी लोकसमितीकडे येऊ लागल्या. गावात पोलिसस्टेशन आहे. संघटना वाढते आहे हे पाहून पोलिसांनी कार्यकर्त्यांना धाकदपटशा दाखविणे, त्यांच्यावर खोट्या केसेस भरणे असले उद्योग सुरू केले.

वीरगाव येथील केसरबाई आस्वले-प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे. महाराष्ट्रभर हे प्रकरण गाजले. या संदर्भात लोकसमिती व युक्रांदने शासनाकडे दाद मागितली. लोकसमितीच्या निवेदनात या प्रकरणाची सविस्तर माहिती आहे. त्यातील महत्वाचा भाग येथे मुद्दाम सांगावासा वाटतोय—

'केशरबाई पिता बबन आस्वले, मु. पो. वीरगाव, ता. वैजापूर, जिल्हा औरंगाबाद. वय १६ वर्षे. या मांग समाजातील अल्पवयीन मुलीला त्याच गावचे पोलीसपाटील श्री. त्र्यंबक हरी बारसे यांचे चिरंजीव देवीदास बारसे यांच्यापासून एक मुलगा झाला आहे.

त्र्यंबक हरी बारसे यांच्या शेतामध्ये व घरी केशरबाई काम करीत असे. त्र्यंबक बारसे यांचा मुलगा देवीदास बारसे याच्यापासून केशरबाईंना दिवस गेले. केशरबाईस फसवून त्याने तिच्याशी शरीरसंबंध ठेवला. देवळात हार घालून लग्नदेखील केले होते; परंतु दिवस गेल्यानंतर त्याने या बाबतीत नकार दिला.

'केशरबाईला दिवस गेल्याचे समजताच तिचा भाऊ छबू बबन आस्वले याने स्वतःच्या अंगठ्याने दिनांक २ सप्टेंबर १९७७ रोजी वैजापूर येथील डी. वाय्. एस्. पी. यांना एक लेखी अर्ज सादर केला, ज्या अर्जावर स्वतः केशरबाईचा अंगठा आहे. या अर्जात केशरबाई-वरील अत्याचाराची चौकशी व्हावी अशी मागणी केली होती.

'दिनांक २ जून १९७८ रोजी देविदास बारसे याने पत्तूलाबाद, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद गावी लग्न केले. त्या वेळी स्वतः केशरबाई व तिचा भाऊ छबू तेथे सत्य हकिकत विचारण्यास गेली असता वाटेतच त्यांना देविदासच्या नातेवाइकांनी गाठले व मारहाण केली. चाकूने धाकही दाखविण्यात आला.'

'त्याच दिवशी युवक क्रांती दलाच्या वतीने त्या ठिकाणी सत्याग्रह करण्यात आला. दहा जणांना अटकही करण्यात आली होती. देविदास बारसे याने केशरबाई व तिच्या मुलास जबाबदारी स्वीकारावी व त्याने दुसरे लग्न करू नये, हीच एकमेव या सत्याग्रहाची मागणी होती; परंतु सत्याग्रहींना अटक झाली आणि बारसे कंपनीला आणखी जोर चढला.

'या सर्व पार्श्वभूमीवर युवक क्रांती दल व लोकसमिती खालील मागण्या शासनाकडे करीत आहे—

१. केशरबाई अत्याचाराची चौकशी करावी.

२. केशरबाई व तिचा मुलगा यांना संरक्षण द्यावे.

३. केशरबाई व तिच्या मुलास सरकारने आर्थिक मदत द्यावी.

४. सदर प्रकरणी दिरंगाई करणाऱ्या पोलिस-अधिकाऱ्यांना तत्काळ निलंबित करावे.'

केशरबाईचे हे प्रकरण रस्त्याला लागते न लागते तोच लोकसमितीच्या पोरांच्या मागे अजून एक भानगड सुरू झाली. दि. ७ ऑगस्ट ७८ रोजी वीरगाव लोकसमितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांना व लोकसमितीचे अध्यक्ष बाबा जगधने यांच्या वडिलांना म्हणजे रंगनाथबुवा (वय वर्षे ६०) पोलिसांनी वैजापूर कोर्टात उभे केले. कशामुळे? पुरावा काय? कोणाच्या आज्ञेवरून? तलाठी रायभान जाधव यांच्या तक्रारअर्जावरून! पोरांवर धडाधड ३९५, ४७ व ३४३ ही कलमे लावली.

वीरगाव तापलेले होतेच. पोलीस जीपमधून कोर्टाबाहेर आणीत असतानाच वीरगावहून वैजापूरला पायी चालत आलेले २०० मजूर

जीपसमोर आडवे पडले. 'आम्हाला अटक करा! पोरांना सोडून द्या!' अशा घोषणा होत होत्या. पोलिसांनी बळाचा वापर करून जीप बाहेर काढली. तेवढ्यात बातमी आली की, ६ तारखेला दुपारीच नांदूर–मधमेश्वर धरणावरील म्हस्की, वीरगाव व वाडी या केंद्रांवरील ५१ गॅंजमधील सुमारे १००० मजुरांनी लोकसमितीच्या कार्यकर्त्यांना अटक झाल्याचे कळताच काम बंद केले.

पण वीरगावचे वातावरण तापलेच कसे? लोकशाही समाजवादावर पहिला अभ्यासवर्ग ऐकून राजकारणाची माहिती करवून घेणाऱ्या पोरांना अटक झालीच का? याला निश्चित अशी एक पार्श्वभूमी आहे, ज्यातून भारतीय नोकरशाही व शासकीय यंत्रणेचे प्रातिनिधिक स्वरूप आपल्या दृष्टीस पडेल.

तलाठ्याने गावातील शेतकऱ्यांकडून तीन वर्षे सारा वसूल करूनही रक्कम तहसीलमध्ये भरली नाही. पावत्या मात्र दिल्या. तहसीलदारांनी गावकऱ्यांना पुन्हा सारा भरण्याचा हुकूम केला. लोकसमितीने त्या प्रकरणी २१,००० रु. च्या भ्रष्टाचाराचा संशय व्यक्त करून तक्रार केली. पुढे हालचाल काहीच नाही. जनता वाट पहात राहिली. सरकार बदलले म्हणून तर उगाच अपेक्षा वाढल्या.

सॉइल कन्सॉलिडेशनच्या कार्यक्रमात तलाठ्याने रेकॉर्ड नवे केले. त्यात वाट्टेल त्याच्या नावाने जमीन दाखविली. ५०–६० लोकांच्या तक्रारी घेऊन लोकसमितीने त्या 'चुकीच्या रेकॉर्ड'बद्दल जाब विचारला. फेरफाराची तुंबून राहिलेली प्रकरणे, सात–बाराच्या उताऱ्याबाबतची लाचखोरी उजेडात आणली. स्थानिक पोलिस, तहसीलदार, फौजदार, कन्सॉलिडेशन अधिकारी, कलेक्टर, सर्वांकडे तक्रारी झाल्या. 'बघ–करू'ची रेकॉर्ड तीन महिने वाजत राहिली. इकडचे पान तिकडे होईना. जनता वाट पहात राहिली. सरकार बदलले म्हणून तर अपेक्षा वाढवून बसली.

वीरगावाहून जवळच रोजगार हमीचे कॅनॉलचे काम चालू आहे. कॅनॉलखाली जाणाऱ्या जमिनीबाबत जमीनमालकांचे सरकारशी करार-मदार झालेले. आता काही जमीनदार जमिनीवर कालवे खोदण्यास मनाई करतात. (हे ओव्हरसियरचे म्हणणे). त्यांचेकडे कॅनॉलच्या कामास बंदी घालण्याचे कोणतेही अधिकारपत्र नसताना ओव्हरसियरसाहेब स्वतःच काम बंद करतो, म्हणतात. बरं हे जाऊ द्या. अशा ३–४ जमिनी सोडून बाकीच्या ठिकाणी तरी कॅनॉलचे काम चालू असावे? पण नरम माती बाजूला झाली आणि मुरुम लागला की ओव्हरसियरसाहेब म्हणतात, आता पुरे, पुढे चला. मुरुमाच्या कामात, त्यापुढील खडक फोडण्याच्या कामात श्रम जास्त लागले तरी रोजी जास्त पडते. (१० ते १५ रुपये). ओव्हरसियरसाहेब म्हणतात, फोडायचा तर फोडा मुरुम! पण दर मात्र नरम मातीचा मिळेल! (२–५० ते ४–५० रु.) म्हणजे इकडूनही उपासमार!

याच दिवसात जमीनदारांना रोजंदारीवर (२–३ रुपये) माणसं हवी असतात. त्यांना ती आज मिळत नाहीत. त्यांच्या सोयीसाठी तर ओव्हरसियरसाहेब काम बंद करीत नाही ना? अशी शंका सर्वत्र बोलली जाते. हे राजकारण मजुरांना मार्क्स-लेनिनची क्रांती व समाजवादाचे वर्गशास्त्र कोण, ह्यावर अभ्यास-वर्ग घेऊन समजावून दिले जाते, असे नाही. मजुरांना ते कळून चुकतेच. ओव्हरसियरसाहेबांच्या 'चुका' स्पष्ट केल्याने मजूर व लोकसमितीच्या पोरांत जिव्हाळ्याचा संबंध निर्माण झालाय.

महाराष्ट्र शासनाच्या 'बेकारांची नावे नोंदवा' आवाहनाला प्रतिसाद देऊन लोकसमितीचे कार्यकर्ते गावोगाव फिरले. म्हस्की, गाढेपिंपळगाव, सिद्धापूरवाडी, सड्डाणा, हणमंतगाव, वीरगाव येथे जाऊन नावनोंदणी सुरू केली. सर्व ठिकाणी या संदर्भात सभा झाल्या. नावनोंदणीच्या वेळी तलाठी श्री. रायभान जाधव म्हणाले, 'माझ्याकडे २०० फॉर्म्स आहेत. त्यापलीकडे मी नावे नोंदविणार नाही!' पोरांनी तहसीलदाराची चिठ्ठी आणली, तलाठी चिडले. 'घाला या चिठ्ठीला!' अशा वर शिव्या घातल्या. लोकसमितीची पोरं व काम करणारे मजूर चिडले. त्यांनी गाढवावरून तलाठ्याची वाजतगाजत गावातून धिंड काढली व पोलिसांच्या हाती सुखरूप स्वाधीन केले. सुखरूप बोळवण केल्याची पावतीसुद्धा पोलिसांकडून त्यांनी घेतली.

हा प्रकार ४ ऑगस्टला घडला.

६ ऑगस्ट ७८ ला लोकसमितीच्या बाबा जगधने, बाळू थोरात, हरिभाऊ कोतवाल, अशोक आव्हाड, वसंत थोरात, पोपट थोरात व शेख अहमद व इतर कार्यकर्त्यांना अटक झाली. प्रमुख आरोपी म्हणून रंगनाथ जगधने वय वर्षे ६० यांना पोलिस-कस्टडी व इतरांना न्यायालयीन कस्टडी मिळाली.

पुढे ७–८ दिवसांनी सर्वांची जामिनावर सुटका झाली. ६० वर्षांच्या रंगनाथबाबांनी कस्टडीतून बाहेर आल्याबरोबर उद्गार काढले, 'मी आजवर सत्याची कास कधी सोडली नाही, प्रथमच मी तुरुंगात गेलो; पण आता मला त्याचे भय उरलेले नाही. यापुढे पोरांच्या मागे उभे राहून त्यांना मदत करणे हेच माझे कर्तव्य!' आज ६० वर्षांचा हा म्हातारा लोकसमितीचा क्रियाशील कार्यकर्ता आहे. लोकसमितीला अशी माणसे मिळत गेली.

लोकसमितीचे औरंगाबाद शहरातील युवकांशी संबंध होतेच. त्यांचे एक शिष्टमंडळ कलेक्टर वगैरेंना भेटले. आश्वासने मिळाली. रोजगाराची कामे सुरू करण्याची ऑर्डर देण्यात आली. हेडकॉन्स्टेबलची बदली करण्यात आली. गृहराज्यमंत्री भाई वैद्य आले. निवेदन दिले गेले. पुन्हा आश्वासन. खोट्या केसेस पाहून घेतो. भ्रष्टाचाऱ्यांना आमच्या राज्यात क्षमा नाही! काम सुरू होईल! आता काय तुमचेच मंत्री. तेव्हा रोजगारही मिळेल!

काय झाले कुणास ठाऊक?

काम सुरू झालेच नाही. वीरगावची जनता वाट पहात राहिली. सरकार बदलले म्हणून तर अपेक्षा उंचावून बसली.

५–६ दिवस निघून गेले. रोजगार हमी योजनेच्या बेकारभत्त्याच्या नव्या सरकारी घोषणा व्हायला लागल्या; पण काम अजूनही सुरू होत नाही, म्हणून लोकसमितीने आंदोलन छेडण्याचे ठरविले. १५ ऑगस्टला एक शेतमजूर मेळावा झाला. रोजगारासाठी तडफडणाऱ्या हजारो मजुरांनी एकच गर्दी केली. जनता पक्षाचे तालुका आमदार श्री. उत्तमराव पटवारी मेळाव्याला उपस्थित राहिले. त्यांची पंचाईत झालेली होती. त्यांच्याच सरकारने आश्वासने देऊन पाळली नाहीत, तर मग ते टीका तरी कोणावर करणार? अर्थात शेवटपर्यंत ते लोकसमितीबरोबर टिकून राहिले हे मान्यच करावे लागेल.

दरम्यान पावसाअभावी आधीच दुष्काळी असलेला वैजापूर तालुका कोरडा पडायला लागला. रोजगार नाही म्हणून ओरड व्हायला लागली. रोजगारासाठी ५०–६० हजार शेतमजुरांनी नोंदणी केली. १६ ऑगस्टला रोजगार हमी योजनेचे कमिशनर श्री. दातार यांच्या समवेत लोकसमितीच्या कार्यकर्त्यांची व अधिकाऱ्यांची चर्चा झाली. कामे निश्चित करण्यात आली. १९ ऑगस्टपर्यंत कार्ये सुरू होतील असे ठामपणे सांगण्यात आले. २१ ऑगस्ट उजाडला. कामांचा पत्ता नाही! हातावर पोट असणारे दुष्काळामुळे उघड्यावर पडले.

तालुक्यात दुष्काळ पसरलेला. खरीपाचे पीक उन्हाने करपून गेलेले. या उलट सधन शेतकरी पाण्याचा साठा असल्याने मग्रुरीत वागायला लागले. त्यांना शेताच्या कामासाठी मजूर मिळत नसे. कारण शेतावर काम करण्याच्या दरापेक्षा रोजगार हमीच्या कामाचा दर जास्तच पडत असे. त्यामुळे साहजिकच खाजगी काम बंद पडायला लागले. त्यामुळे सधन व श्रीमंत शेतकऱ्यांनी सरकारी अधिकाऱ्यांना दबावाखाली आणून कामे अडवून धरली. कामे बंद झाली असल्यामुळे मग मजूर सधन शेतकऱ्यांकडे शेवटी कामासाठी हातपाय पसरायला लागला. स्त्रीला १·२५ रु. व पुरुषाला १·७५ रु. असा मोबदला मिळायला लागला. गावचे सरपंच, तहसीलदार हेच लोक व तलाठी यांच्याच खिशातले. मग काय सर्वांचे मिळून राज्य चालले. कामे मात्र सुरू झाली नाहीत. कामे काढण्याच्या ऑर्डर्स असताना सुद्धा.

शेवटी व्हायचे तेच झाले. २२ ऑगस्टपासून मजूर संतापले. लोकसमितीने असंतोषाला वाट करून दिली. मोर्चा तहसीलवर न्यायचा कार्यक्रम ठरला. टेंभा, कवटगाव, सटाणा, नादी, हणमंतगाव, धोंवलगाव, नादी, वाडी इत्यादि गावी सभा व्हायला लागल्या. वातावरण तापायला लागले. पोलिसांच्या,तहसीलदारांच्या, इंजिनियरसाहेबांच्या गाड्या फिरायला लागल्या. मोर्चा रद्द झाल्याचा प्रचार करण्यात येऊ लागला. वातावरण हातावाहेर जाऊ नये म्हणून औरंगाबादहून युक्रांदचे प्रवीण वाघ, प्रा. मानवेन्द्र काचोळे, कलंत्रे ही नेतेमंडळी वीरगावकडे सरकली. एका मोटारसायकलवर लोकसमितीचे शांताराम पंदेरे, बाबा जगधने व इतर दोन पोलिसांच्या नजरा चुकवीत फिरायला लागले. उत्स्फूर्त पाठिंबा मिळायला लागला. ४–५ हजारांचा मोर्चा वैजापुरात शिरला तर अवघड होईल, म्हणून मग पोरांनी ५०० जणांनीच मोर्चाने सत्याग्रह करण्याचे ठरविले. ' पोटासाठी जो कायदा आडवा येतो तो आम्ही मोडणार व त्याबद्दल जी शिक्षा होईल ती आम्ही भोगणार ' ' जब तक इन्सान भूखा रहेगा तब तक धरतीमें तुफान रहेगा '. अशा घोषणा देत व निर्धाराने मोर्चा निघाला. सत्याग्रह झाला. अटकही झाली. सर्वांना औरंगाबादच्या कारागृहात आणले गेले. त्यात बऱ्याच स्त्रियाही होत्या. पुढे सतत रोज सत्याग्रह सुरू झाले. ' एस्. टी. रोको'चा सत्याग्रह झाला. प्रचंड तणाव वाढला.

शेवटी २७ ऑगस्टला बोलणी सुरू झाली. तलाठी, तहसीलदार, ओव्हरसियर सर्वांचे वाभाडे निघाले. रोजगार हमीची कामे सुरू करा, तलाठी-तहसिलदाराची चौकशी करा, नामांतर-दंगलीच्या मागील जातीयवादी शक्तींना शिक्षा करा व वैजापूर तालुका दुष्काळी म्हणून जाहीर करा, अशा मागण्या लोकसमितीने पुढे ठेवल्या. कामाची मागणी मान्य झाली. बाकी प्रश्न सरकारच्या हातात असल्याने नुसतेच आश्वासन मिळाले. १५ दिवसांच्या संघर्षानंतर रोजगार मिळाला. आंदोलन थंडावले.

वीरगाव लोकसमितीच्या या आंदोलनाने रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीतले अनेक प्रकार उजेडात आणले आहेत. या सर्व प्रश्नावर आपण लक्ष देऊन ही योजना अधिक कार्यरत व सोवळी कशी राखू शकतो व मागासलेल्या तालुक्यांचे नियोजन अधिक प्रमाणबद्ध कसे बनविता येईल, हे महत्त्वाचे प्रश्न आज या निमित्ताने उभे राहिले आहेत.

वैजापूर तालुका ६९ सालापासून दुष्काळाच्या छायेत वावरत आहे. सर्व भारतात पाऊस पडला तरी आमच्याकडे पाऊस नाही, हे वैजापूरकरांचे नेहमीचे गाणे. अर्थात ते खरेच आहे. हजारो एकर पडीक जमीन तुम्हाला खायला उठतेय असे वाटेल. महाराष्ट्र सरकारने या तालुक्यासाठी एक मास्टर प्लॅन तयार केला होता. तो ठरलेल्या वर्षापेक्षा दीड वर्ष लवकर संपुष्टात आला. दुष्काळाची वाढती कमान आणि मजुरांच्या संख्येत बेफाट होणारी वाढ लक्षात न आल्याने कोणत्याच गोष्टींचा मेळ राहिला नाही. आज तालुक्याची भीषण अवस्था झालीय ती यामुळेच. तालुक्याचा विकास करायचा असेल तर तालुक्यातील किती हातांना काम पाहिजे, तालुक्यातील उत्पादनक्षम कामांचा आराखडा, जमिनीचा कस, पावसाचे प्रमाण आदींचा सखोल विचार व्हायला पाहिजे. या सर्वांगीण प्रश्नांचा विचार झाल्यावर काही काळाकरिता नियोजनबद्ध असा ' आखीव कार्यक्रम ' असला पाहिजे. हा नियोजनबद्ध कार्यक्रम राबविण्यासाठी अत्यंत कार्यक्षम, प्रामाणिक आणि हुषार यंत्रणा सज्ज असली पाहिजे. भुकेल्या माणसांना समजावून घेऊन या कार्यक्रमात सहभागी करून घेण्याचे व्यवहारज्ञान या यंत्रणेला असणे अत्यंत आवश्यक असते; पण असे कुठे म्हणून घडते ?

ज्या योजनेत संपूर्ण तालुक्याचे हित गुंतले आहे त्या नांदूर–मधमेश्वर कालव्यावर लक्ष केंद्रित केले ते लोकसमितीने व युक्रांदने, सरकारी अधिकाऱ्यांनी नव्हे. नांदूर-मधमेश्वर ही प्रचंड भानगड आहे. रोजगार हमी योजनेखाली चाललेले हे कालव्याचे काम आहे; परंतु केवळ लोकांच्या दबावामुळे सरकारने हे काम सुरू केले. त्यामुळे कालव्याच्या खोलीपासून ते रुंदापर्यंत सर्व प्रश्न अधांतरी लटकून पडले आहेत. मजूर नाहीत म्हणून ज्या नाशिक जिल्ह्यातून या कालव्यास सुरुवात होते तेथे काम सुरू झाले नाहीय, याची दखल कोणीच घेत नाही. याचा परिणाम वैजापूर तालुक्यावर असा झालाय की, कालव्याखाली ज्या शेतमालकांची जमीन जातेय त्यांपैकी छोट्या शेतकऱ्यांनी जमीन ' मार्क-आउट ' होताच जमीन वापस केली व भूमिहीन म्हणून कामाला लागले. कालव्यावर जमिनीची वर्गवारी करताना सतत घोळ केला जातो. मऊ मातीचा ( soft soil ) भाव मुरुमाला ( soft Rock ) तर मुरुमाचा भाव खडकाला ( Hard Rock ) दिला जातोय. गावच्या सरपंच व तलाठी लोकांना भरपूर रोज दिला जातो; पण सामान्यांना नाही.

काम करू इच्छिणाऱ्या म्हाताऱ्यांना कामावर घेतले जात नाही. काम कमी असताना गावातील प्रत्येक घरातील फक्त एक माणूस कामावर घेतला जातो. तो जर आजारी पडला तर त्याच्या घरातील इतरांना मात्र घेतले जात नाही. मजुराचे नाव नोंदवायला व नोंदणी कार्डस् द्यायला पाटलाचे, तलाठ्याचेच हस्तक असतात. त्यामुळे त्यांच्याच लोकांना कार्डस् मिळतात. गावातील ज्यांना काम हवे त्यांची नावे मात्र सर्वत्र साध्या कागदावर नोंदविली जातात; पण कार्ड वाटप करताना ' जवढे काम आहे तेवढ्यांनाच कार्डस् वाटणार, ' असे दटावून सांगितले जाते. त्यामुळे अनेकांना कार्डस् मिळालेली नाहीत. साइटवरील ओव्हरसियरला कामासाठी ज्या मजुरांची यादी द्यायची असते ती कोणत्या निकषावर करावयाची ? हे निकषच कोणी ठरविलेले नाहीत. गावात ७०० मजूर असतील व ५०० जणांचे काम असेल तर कोणाला डावलणार ? म्हणजे हेवेदावे आलेच. ज्यांची काम करण्याची ताकद नाही त्यांची नावे नोंदविली जातात व ती माणसे आली नाहीत असे पाहून तलाठ्याची, सरपंचाची माणसे घुसडली जातात. स्त्रियांना छळण्याचा प्रश्न तर आहेच. रोजगार नोंदणी कार्डाच्या मागे १ रुपया घेतल्याची घटना आंदोलनानंतर ओव्हरसियरसाहेबांनी कबूल करावी हे बोलके आहे.

अनुत्पादक कामे काढण्यापेक्षा उत्पादक कामे काढावी अशी आज मागणी केली जातेय. खडी फोडून व ज्यावरून एस्. टी. जाऊ शकत नाही ते रस्ते बांधून उपयोग काय ? तालुक्याचा विकास होणार कसा?

नामांतर-दंगलीच्या पार्श्वभूमीवर सवर्ण–दलित शेतमजुरांचे आंदोलन लोकसमितीने काही प्रमाणात यशस्वी केलेय हे खरेय; पण नुसताच संघर्ष करून संघटन उभे राहिल्यावर १०–१२ गावातील या लोकसमित्या स्वतःचा व तालुक्याचा विकास कसा करणार, याकडे सर्वांचे लक्ष आहे. कारण त्यामुळे लोकसमितीच्या एका नव्या माध्यमाचा साक्षात्कार आपल्याला झाल्याचे सर्वांना निश्चितच वाटेल.

□

# ढासळलेली मूल्ये

## जक्कल का निर्माण होतात ?

वा. दा. रानडे

जोशी–अभ्यंकर हत्याकांड खटल्याची सविस्तर पार्श्वभूमी आणि निकालपत्रातील महत्त्वाचे मुद्दे सर्व वृत्तपत्रांत येऊन गेलेले आहेत. त्यांची पुनरुक्ती येथे करीत नाही; पण माणसे खुनास प्रवृत्त का होतात, खुनी माणसाची मनोवृत्ती तशी का बनते या मूलभूत प्रश्नांचे अधिक खोलवर विचारमंथन, त्याबाबत संशोधन आणि त्याआधारे परिणामकारक उपाययोजना आपण काय करणार आहोत हा प्रश्न आपण सर्वांनीच अंतर्मुख होऊन स्वतःला विचारायला हवा.

न्या. बापट यांचे संपूर्ण निकालपत्र हा लेख लिहिण्यापूर्वी पहावयास मिळू शकले नाही; पण या खटल्यातील तरुण गुन्हेगारांच्या मनोवृत्तीची समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय चिकित्सा त्यात काय केली आहे हे जाणण्याची मला उत्सुकता होती. वृत्तपत्रात निकालपत्राचा जो भाग प्रसिद्ध झाला आहे त्यात या प्रश्नाला थोडासाच स्पर्श झालेला आहे. आरोपींचे तरुण वय लक्षात घेता त्यांना फाशीची शिक्षा न देता त्यापेक्षा कमी कडक शिक्षा द्यावी अशी विनंती आरोपींच्या वकिलांनी केली होती. न्या. बापट म्हणतात, 'आरोपींनी केलेले गुन्हे अत्यंत निर्घृण आणि क्रूर भावनेने केलेले असल्याने ते तरुण असूनही दयामाया दाखविण्याच्या पात्रतेचे नाहीत. त्यामुळे त्यांना जास्तीत जास्त शिक्षा देणेच योग्य ठरेल. या तरुणांच्या बाबतीत तारुण्याचा विचार करणे योग्य होणार नाही. या तरुणांनी जीवनात कधीही हिरवळ पाहिली नाही तर फक्त मसणवटच पाहिली. त्यांनी कधी चमकत्या ताऱ्यांचा विचारच केला नाही तर सदैव दलदल आणि घाणीचाच विचार केला. फुललेल्या जीवनाचा त्यांनी कधी विचार केलाच नाही. उलट सतत मृत्यू आणि खून यांचाच केला... आरोपींनी आपल्या कृष्णकृत्यांनी मांगल्याविषयी थोडाफारही आदर दाखविला नाही म्हणूनच त्यांना सर्वांत जास्त म्हणजे देहान्तांचीच शिक्षा योग्य ठरेल !'

आरोपींच्या वृत्तीचे यथार्थ वर्णन न्यायमूर्तींनी केले आहे; पण समाजात जक्कल का निर्माण होतात ? त्यांची वृत्ती अशी का बनते याची सखोल चिकित्सा व्हावयास हवी. निकालपत्राचा जो भाग वृत्तपत्रात प्रसिद्ध झाला आहे त्यात तरी यासंबंधी काही विवेचन आढळत नाही.


अत्यंत निर्घृणपणे दहा खून करणारे हे तरुण सुखवस्तू कुटुंबातील होते, दारिद्र्यामुळे ते अशा गुन्ह्यांकडे वळलेले नाहीत, दारिद्र्य हे सर्व गुन्हेगारीचे मायपोट असा सिद्धान्त काही समाजशास्त्रज्ञांनी पूर्वी मांडलेला आहे आणि हा सिद्धान्त आधुनिक काळातलाच आहे असेही म्हणण्याचे कारण नाही. 'बुभुक्षितः किं न करोति पापम्' यासारखी संस्कृत वचने त्याच्या प्राचीनत्वाची साक्ष देतील; पण दारिद्र्य हे गुन्हेगारीचे कारण एवढ्याच मर्यादित अर्थाने हा सिद्धान्त खरा म्हणता येईल. दारिद्र्य हेच गुन्हेगारीचे प्रमुख कारण असेल तर अमेरिकेसारख्या संपन्न देशात खून व इतर गुन्हे का वाढले ? अमेरिकेत दर नऊ सेकंदांना एक खून आणि दर छत्तीस सेकंदांना एक घरफोडी व बलात्काराचा गुन्हा घडतो. भारतात दर ६७ मिनिटांनी एक खून व दरोडा आणि दर तासाला एक आत्महत्या घडते अशी माहिती संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या गुन्हे प्रतिबंधक समितीचे उपाध्यक्ष परिपूर्णानंद वर्मा यांनी मागे एकदा सांगितली होती. अगदी अलीकडचे आकडे उपलब्ध नसले तरी सर्वसाधारणपणे गुन्ह्यांमध्ये वाढच होत आहे हे लक्षात घेता वर दिलेल्या प्रमाणात वाढ झाली असण्याचीच अधिक शक्यता आहे.

आजच्या पिढीवर चांगले संस्कारच होत नाहीत, त्यांच्यापुढे चांगले आदर्शच नाहीत, जीवनात सर्वत्र वरपासून खालपर्यंत रोज भ्रष्टाचाराचेच दर्शन घडतं. वापरून गुळगुळीत झालेला शब्दप्रयोग वापरावयाचा तर भ्रष्टाचार हाच शिष्टाचार झालेला आहे. स्वार्थ, सत्ता, पैसा, जास्तीत जास्त सुखोपभोग हीच सर्वश्रेष्ठ मूल्यं झालेली आहेत. त्याग, सेवा, साधेपणा, सदाचार, दुसऱ्याचं दुःख हलकं करण्याचा प्रयत्न करणं, त्याच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी झगडणं, दुर्बलांना मदतीचा हात देणं या मूल्यांचा एक तर वेडेपणा म्हणून उपहास होत आहे किंवा त्यांचा तोंडदेखला गौरव करून प्रत्यक्षात ती पायदळी तुडविली जात आहेत. आजचं जीवन म्हणजे एक प्रचंड ढोंग झालेलं आहे. ध्येयवादी, त्यागी व्यक्तींचा आम्ही गौरव करीत नाही असे नाही. आम्ही त्यांना एकदम देव करून टाकतो. त्यांचे पुतळे उभारतो. भाषणातून सतत त्यांची वचनं उद्धृत करीत असतो, वर्षातून एक दिवस त्यांची जयंती साजरी करतो आणि बाकी सबंध वर्षभर त्यांना विसरून जातो. समाजातील बहुसंख्य व्यक्तींच्या जीवनाचं हे सर्वसाधारणपणे प्रातिनिधिक चित्र आहे. काही थोडे अपवाद असतील; पण ते इतके थोडे आहेत की त्यांचा प्रभाव फार मर्यादित प्रमाणात पडतो. हे आदर्श आपल्यासाठी नाहीत. त्यांचं स्थान देवघरात. त्यांची फक्त पूजा करावयाची अशी आमची वृत्ती असते. आजच्या पिढीविरुद्ध जुन्या पिढीची ही सार्वत्रिक तक्रार असते. आजची पिढी त्याला रडगाणं म्हणते. हे पिढीचं अंतर आहे. आमचं वागणं तुम्हाला समजणारच नाही असं उत्तर त्यांना मिळतं.

हे असं का घडत आहे ? व्यक्तिहित आणि समाजहित यांची योग्य सांगड न घातल्यानं ही परिस्थिती निर्माण झाली आहे. भांडवलदारी संस्कृतीत व्यक्तिस्वातंत्र्याच्या मूल्याला अवास्तव महत्त्व दिल्यानं या साऱ्या अपप्रवृत्ती निर्माण झाल्या आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाला पूर्ण संधी मिळायला हवी; पण दुसऱ्या व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर व हक्कांवर आक्रमण करून मिळविलेलं स्वातंत्र्य व साधलेला विकास हे खरं व्यक्तिस्वातंत्र्य व खरा व्यक्तिविकास नव्हे. समाजवादाची आवश्यकता आहे ती त्यासाठी; पण समाजवादाचा अवलंब करताना कम्युनिस्टांनी दुसरं टोक गाठलं. समाजहिताच्या नावाखाली तेथे व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी झाली. समाजवाद किंवा साम्यवाद तत्त्वतः मान्य असूनही प्रस्थापित राजवटीची काही धोरणं

पृष्ठ २० वर

# जोशी – अभ्यंकर हत्याकांड



# एका वार्ताहराची दैनंदिनी

## भाग दुसरा । वरुण भिडे

**२ जून ७८ । तेरावा दिवस**

कोल्हापूर-प्रकरणच चालू आहे.

**३ जून ७८ : चौदावा दिवस**

कोल्हापूर-प्रकरणातील महंमद टायरवाला या साक्षीदाराने बरीच करमणूक केली. सबडिव्हिजन मॅजिस्ट्रेटची साक्ष सुरू झाली. प्रत्येक वेळी तीच तीच माहिती सांगितल्याने कंटाळवाणी साक्ष झाली.

**५ जून ७८ : पंधरावा दिवस**

सबडिव्हिजनल मॅजिस्ट्रेटची उलटतपासणी सुरू झाली. एकएक उत्तरे इतकी दिव्य होती की, आपण कुठल्या हुद्द्यावर आहो याची या गृहस्थाला जाणीव होती की नाही कोण जाणे. शक्यता अशीही आहे की, त्यांचे वागणे बरोबर होते आणि वकील वेडेवाकडे प्रश्न विचारीत होते; पण तशी शक्यता गृहीत धरली तरी इतक्या जबाबदारीच्या जागेवर काम करणाऱ्या माणसाने गांगरण्याचे कारण काय ?

**६ जून ७८ : सोळावा दिवस**

सबडिव्हिजनल मॅजिस्ट्रेटची नागूअण्णांनी जबरदस्त खरड काढली. असा साक्षीदार मिळाला म्हणजे नागूअण्णा मांजराने उंदराला खेळवावे तसा खेळवतात. नागूअण्णांचे बोलणे म्हणजे उपहास, उपरोध, कुत्सितपणा, तीक्ष्ण बुद्धी यांचे कारंजेच असते. साक्षीदारमहाशय रडकुंडीला आले होते. आणखी अर्धा तास उलटतपासणी लांबली असती तर त्यांचा स्वत:वरचा कंट्रोल गेला असता असे वाटले. प्रत्यक ओळख परेडच्या वेळांबाबत तर इतक्या गंभीर चुका होत्या की विचारायला नको. प्रत्येक ठिकाणी खाडाखोड. सर्वांत गंभीर बाब म्हणजे त्यांनी सर्व चुका शिरस्तेदाराच्या माथी मारल्या. अनेक सरकारी अधिकाऱ्यांमध्ये ही वृत्ती दिसते. हा बळी देण्याचाच प्रकार आहे. या गृहस्थांच्या वागण्यात चुका नसतील असे मानू; पण इतके भोंगळ लोक आपल्यावर राज्य करीत आहेत याची दिवसभर खंत वाटत होती. निकालपत्रात या महाराजांना बरेच तडाखे मिळतील असे वाटते.

**७ जून ७८ : सतरावा दिवस**

डॉ. टंकसाळे यांची उलटतपासणी आज संपली. कोळसे पाटलांनी अतिशय अभ्यासपूर्ण प्रश्न विचारले. 'काही हाडे झिजलेली होती म्हणजे बाकीची झिजलेली नव्हती असे नाही' असे या डॉक्टरांनी उत्तर दिले. तज्ज्ञ मंडळी इतके अघळपघळ मत कसे देतात? आश्चर्य आहे.

**८ जून ७८ : अठरावा दिवस**

सरकारी वकिलांनी मधेमधे बोलण्याचा आज कहर झाला.

जोशींच्या घरात सापडलेल्या विजेच्या बिलासंबंधी प्रश्न चालू होते. साक्षीदार डिफेन्सला अपेक्षित उत्तर देण्याच्या काठावर आला होता. तेवढ्यात शामराव म्हणाले, 'हे बिल वेगळे आहे असे त्यांनी आधी सांगितले होते.' खरे म्हणजे तसे काही सांगितले नव्हते. चक्क उत्तर सुचविण्याचा प्रकार होता. साक्षीदाराने धागा पकडला आणि सरकारपक्षाला हवे ते उत्तर दिले. आरोपीच्या वकिलाने खूप हातपाय आपटले; पण संधी हुकली होती. 'हे बिल ( टपरीत जप्त केलेले ) जोशींच्या बंगल्यात सापडले का?' या प्रश्नाला साक्षीदार हो म्हणाला असता तर टपरीचा पंचनामा मुळापासून जात होता. 'बनावट पुरावा आहे,' असे सहज म्हणता आले असते.

आजचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे उदय जोशींची साक्ष. 'आमच्या घरी आता मी एकटाच उरलो आहे,' हे वाक्य इतके विलक्षण वाटले की, तोच बातमीचा लीड केला. इतका देखणा, नाजूक मुलगा आणि मुलायम आवाज की, त्याच्याबद्दल शंका तरी कशी आली याचे आश्चर्य वाटते.

जोशी कुटुंबाचे खून झाले त्या वेळी असंख्य लोकांनी उदयनेच हा प्रकार केला, आम्ही त्याला पुण्यात पाहिला असे सांगितले होते. पोलिससुद्धा या दिशेने तपास करीत होते. पुढे रांची ते पुणे हे वेळापत्रक जमेना. अनोळखी लोकांनी कल्पनेच्या भराऱ्या मारल्या तर विशेष काही नाही, पण कॉलनीत राहणारेच या मुलाबद्दल शंका व्यक्त करीत होते हा शुद्ध निर्लज्जपणा होता. आपल्याला काही तरी माहिती आहे हे दाखविण्याच्या हौसेपोटी ही मध्यमवर्गीय मंडळी काय वाटेल ते बोलत असतात !

## ९ जून ७६ : एकोणिसावा दिवस

जोशी कुटुंबाचे उपाध्ये मोघे यांची साक्ष झाली. 'कोर्टापुढे आहे ती अन्नपूर्णा. सरस्वती म्हणजे अन्नपूर्णा नव्हे,' असे त्यांनी उलटतपासणीत सांगितले. आरोपीच्या वकिलांनी बरीच खटपट करून हे उत्तर मिळविले खरे; पण जप्त केलेल्या वस्तूंची आम्ही पहाणी केली तेव्हा तिथे अन्नपूर्णेचीच मूर्ती होती. माझ्या डायरीत तशीच नोंद आहे. कुठल्या तरी तिसरी पास कॉन्स्टेबलने 'सरस्वती' लिहिले असेल. अर्थात पोलिसांनी अशा गोष्टींतही काळजी घ्यायला हवी होती.

आज देशमुख नावाचा एक साक्षीदार आणला गेला. त्यांनी वस्तू ओळखल्या. हा साक्षीदार, त्याने सांगितलेली स्वतःची पार्श्वभूमी आणि जोशी-कुटुंबाशी असणारे जुने संबंध ही सर्व कहाणी म्हणजे पोलिसांच्या हिकमतीची आणि मेहनतीची तारीफ केली पाहिजे. हा साधाभोळा वाटणारा साक्षीदार पुराव्यातील घड्याळ आणि अन्नपूर्णा याला पक्का पुरावा ठरणार.

## १३ जून ७८ : विसावा दिवस

जोशी प्रकरणातही आज बरेच साक्षीदार आले होते. त्यात नगरकर नावाचा साक्षीदार मला सारखा ओळखीचा वाटत होता. नंतर आठवले की, तो शाळेत माझ्या मागे चार वर्षे होता.

## १४ जून ७८ : एकविसावा दिवस

बाफना प्रकरणातला पुरावा आज सुरू झाला. फरुक नावाचा बाफनांचा दिवाणजी उलटतपासणीत हिंदीचा आग्रह धरत होता आरोपीच्या वकिलांना हिंदी येत नाही, हे लक्षात आल्यावर तर तो हिंदीसाठी अडूनच बसला !

## १५ जून : बाविसावा दिवस

आज फरुक, मिसेस बाफना यांच्या साक्षी झाल्या. रात्री फरुकचा फोन आला. फर्स्टक्लास मराठी बोलत होता. 'आरोपीच्या वकिलाला हिंदी येत नाही असे छापा' म्हणून आग्रह चालू होता. 'आजचा 'सकाळ' वाचला का?' असे विचारल्यावर म्हणाला, 'आमच्या घरी साडेसात वाजता 'सकाळ' येतो; म्हणून साडेपाच वाजता स्टेशनवर जाऊन 'सकाळ' घेऊन आलो.'

याच माणसाने 'आपल्याला फक्त हिंदी येते, मराठी नाही. आमच्या घरी 'सकाळ' येत नाही. पेपरच वाचत नाही,' अशी साक्ष देताना उत्तरे दिली होती. त्याबद्दल विचारल्यावर म्हणाला, 'बदमाष लोकांना सुटायला कशी संधी देणार साहेब ! त्यांना शिक्षा होणार असेल तर आपण दहा वेळा खोटे बोलू.'

फरुक हा स्वतःच मरता मरता वाचलेला माणूस आहे. त्याची भूमिका बाजूला ठेवली तरी एकंदरीत लोकांनी 'हे आरोपीच गुन्हेगार आहेत,' असे ठाम मत बनवलेले आहे. कायदा भले म्हणो, 'दहा गुन्हेगार सुटले तरी चालतील; पण एक निरपराध अडकू नये.' वर्तमानपत्रात एकदा अब्रूचा पंचनामा झाला की, लोकांच्या दृष्टीने निकाल लागलेला असतो.

## १६ जून ७८ : तेविसावा दिवस

आजच्या साक्षीदारानेही आपण वर्तमानपत्रे पहात नाही, शाळेत येतात की नाही हे माहिती नाही, अशी उत्तरे दिली. शेवटी बापटसाहेबच म्हणाले, 'त्यांना वर्तमानपत्रांपासून, विशेषतः स्थानिक वर्तमानपत्रांपासून दूर ठेवलेले आहे. प्रश्न विचारण्यात अर्थ नाही.'

## १७ जून ७८ : चोविसावा दिवस

एकंदर रटाळ प्रकार झाला. साक्षीला आलेले एक इन्स्पेक्टर गॉगल लावून साक्ष देत होते. वाईट दिसते. डोक्यावरची टोपीही काढली नव्हती. माझी कल्पना कोर्टात हेदेखील चालणार नाही.

## १९ जून ७८ : पंचविसावा दिवस

आजही सगळे उरलेसुरले साक्षीदार झाले. एकूण प्रकार बोअरच.

## २० जून ७८ : सव्विसावा दिवस

ग. का. अभ्यंकरांची साक्ष झाली. सुरुवातीला त्यांनी अभ्यंकर-कुटुंबाची पार्श्वभूमी सांगितली. विद्वत्तेची आणि बुद्धिमत्तेची झळाळी काय सांगावी ! अशी परंपरा फारच थोड्या घरात असते. वासुदेवशास्त्री प्रसिद्ध होतेच. काशीनाथशास्त्री जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलर होते. पुढेही त्यांना अनेक बहुमान मिळाले. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे विद्वान होते. स्वतः ग. का. अभ्यंकर बी. एस्सी. फर्स्टक्लास. ऑल इंडिया सर्व्हिसमध्ये नोकरी, आय. सी. डब्ल्यू. ए. चे पहिले आणि एकमेव मराठी अध्यक्ष. धनंजय केंद्रीय बोर्डात पंचाऐंशी टक्के मार्क

मिळवून अखिल भारतीय स्पर्धेतून वेल्लोर मेडिकल कॉलेजमध्ये निवडला गेलेला. मी तर ऐकूनच थंड पडलो. अभिमान बाळगावी अशी ही शंभर वर्षांची परंपरा एका झडपेत नष्ट होते. सारा विलक्षणच प्रकार. अशा स्थितीत अभ्यंकर ज्या शांतपणे आणि निश्चयाने साक्ष देत होते तो विलक्षण धैर्याचा प्रकार होता.

अभ्यंकरांचे मराठी आणि इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वदेखील विलक्षण होते. त्यांच्या वाक्यांचा मराठी अनुवाद होत असताना ते शामरावांनी सांगितलेल्या इंग्रजी शब्दाला अधिक अर्थवाही प्रतिशब्द सांगत. मराठी शब्दांचा वापरदेखील अत्यंत अचूक करीत. मराठीवर उत्तम प्रभुत्व असणारे अनेक लोक पाहिले आहेत. रँग्लर महाजनी, पालखीवाला, सोरावजी, अ. भि. शहा यांचे इंग्रजीवरचे प्रभुत्व पाहिले आहे; परंतु महाजनी–शहा ही मंडळी साध्या साध्या मराठी शब्दांना अडतात. दोन्ही भाषा इतक्या सहज वापरणारी माणसे क्वचितच दिसतात.

त्यांच्या साक्षीतील काही गोष्टी अतिशय हळवेपणा आणीत होत्या. १९२४ साली आजोबांनी प्लॉट घेतला. पन्नास वर्षे तो पडून राहिला. ही एखादी शापित जागा असेल की जागेला बळी हवा होता आणि पन्नास वर्षांची वखवख एका घासात संपवली असेल. घर बांधल्यावर जेमतेम वर्षभरातच ही भयाण घटना घडली. वासुदेवशास्त्रींनी किती हौसेने प्लॉट घेतला असेल, काशीनाथशास्त्रींनी त्यावर कल्पनेने इमला चढविला असेल. पन्नास वर्षे पडीक राहिलेल्या या जागेने पाच बळी कशासाठी घेतले असतील, की अज्ञात नियतीने पन्नास वर्षे आधीच ही तयारी केली असेल ? 'धनंजयच्या परीक्षेचा निकाल दुर्दैवाने त्याच्या मृत्यूनंतर आला. त्यात तो पहिला आला.' या वाक्याच्या वेळी अभ्यंकरांचा कंठ दाटून आलाच; पण कोर्टात अनेकांनी आपले दुःख अश्रू, उसासे आणि हुंदके देऊन व्यक्त केले. सामान्य माणूस तर सोडाच, हलकटातला हलकट माणूसदेखील या वाक्याला हेलावला असता !

वस्तू ओळखताना त्यांनी काही वस्तू आपल्या नव्हेत, असे सांगितले. 'वस्तू आपल्या आहेत हे सिद्ध करायला पुरावा काय ?' असे डिफेन्सचे वकील विचारतील; पण 'त्यांच्या नाहीत,' असे सिद्ध करायला तरी काय मार्ग असतो ? साखळीसारखी साखळी. साखळी, मोहनमाळ चोरीस गेलेली आहे. समोर तशाच वस्तू आहेत. त्या आमच्याच म्हटले तर काय हरकत होती ? पण 'नाही' म्हणून सांगितले, याचा उघड अर्थ 'हा साक्षीदार शब्दाचा धड आहे.' मला वाटते, न्यायाधीश अभ्यंकरांची साक्ष शंभर टक्के ग्राह्य धरतील. डिफन्सतर्फे कितीही शाब्दिक कोलांटया मारल्या तरी उपयोग होणार नाही.

उलटतपासणीत त्यांना एक प्रश्न विचारला, 'आत्ता आठवते ते सांगतो. बाकी नंतर सांगेन, असे म्हणालात का ?' त्यावर त्यांचे उत्तर असे का, 'असे सांगायला हवे हे मला माहिती नव्हते. मला वाटले, नंतर सांगता येईल.' खरा प्रश्न असा की, कुठल्या तरी अपप्रवृत्तीचा प्रहार होणाऱ्या व्यक्तीला कायदेशीर तांत्रिक बाबी माहिती असाव्यात, अशी अपेक्षा बाळगणे अमानुषपणाचे होते.

## २१ जानेवारी १९७८ : अठ्ठाविसावा दिवस

सौ. हिराबाई अभ्यंकरांची आज साक्ष झाली. या बाई रडतील असे मला सारखे वाटत होते; परंतु शामरावांनी 'दुःखावरची खपली काढणारे प्रश्न विचारणार नाही,' असे स्पष्ट केले असल्याने तो प्रसंग टळला. हिराबाई अतिशय रूपवान होत्या. आता पन्नास-पंचावन्न वर्षांच्या असतील. तरीही त्यांचे रूप आणि रुबाब वाखाणण्यासारखा होता. इंग्रजी आणि संस्कृत घेऊन त्या एम्. ए. झाल्या आहेत. दागिने ओळखण्याची खास खूण काय, या प्रश्नावर उत्तर देताना त्यांनी 'फील' हा शब्द वापरला. त्यावरून आणि नंतर वेळोवेळी दिलेली उत्तरे यावरून त्यांच्या बुद्धीची झलक स्पष्ट झाली. रूप आणि बुद्धिमत्ता या दोन्ही गोष्टी एकत्र असणे क्वचितच आढळते. आकलनापलीकडचे दुःख झाल्यावरही इतका रुबाब असणाऱ्या या बाई सुखसमाधानाच्या शिखरावर असतानाच्या समारंभात एखाद्या राजकुलीन स्त्रीसारख्या दिसत असतील ! पेशवाईतील रमाबाई, आनंदीबाई यांची वर्णने असतात ना तशा त्या दिसत होत्या !

मला सगळ्यात जाणवले ते त्यांच्या चेहऱ्यावर आणि आवाजात असणारा अवर्णनीय मायाळूपणा ! मुलांवर त्यांची किती माया असेल हे त्यांच्या साक्षीत दिसत होते. अभिमान बाळगावी अशी फुलांसारखी मुले चिरडून टाकलेली पहाताना आईच्या मनाला काय यातना झाल्या असतील ही कल्पना सुद्धा करणे शक्य नाही !

'जाईला फ्लू झाला होता म्हणून मऊ भात, मेतकूट आणि दही करून ठेवले होते.' 'माझ्या धनंजयसाठी त्याच्या आवडीची बटाटयाची भाजी करून ठेवली !' 'धनंजयला टोस्ट फार आवडत. त्या वेळी अमूल बटर मिळत नसे म्हणून त्याच्या मामीने लाडक्या भाच्यासाठी दुकानातून शोधून अमूल बटरचे पाकीट आणले होते,' ही साधेपणेच उच्चारलेली एक एक वाक्ये रक्त गोठवून टाकीत !

अभ्यंकरांनी काही वस्तू ओळखताना त्या आपल्याला कुठे मिळाल्या वगैरे तपशील दिला. दागिने वगैरे नुसते ओळखले. हिराबाईंनी ओळखलेल्या एकेका वस्तूमागे त्यांचा त्यांचा इतिहास होता. सासू-सासरे, आई, मुली, भावजय अशा व्यक्तींच्या आठवणी होत्या. या बाई 'घर' या इन्स्टिटयूशनमध्ये इतक्या गुंतलेल्या होत्या की, त्यांना या धक्क्यातून सावरणे कसे शक्य झाले असेल समजत नाही. 'हे महालक्ष्मीचं चांदीचं नाणं माझ्या सासूबाईंनी मला दिलं होतं. म्हणाल्या, दिवाळीत पूजा करीत जा. माझे सासरे चेष्टेने म्हणाले, 'आपल्या घरात सरस्वतीची पूजा हवी.' साध्या चांदीच्या नाण्याचा या बाईंचा एक इतिहास होता. इतकी सुंदर घटना कुणाला काल्पनिकरीत्या मांडायची म्हटली तरी सुचणार नाही; पण कसली लक्ष्मी अन् कसली सरस्वती ! अकाळविकाळ महाकालीनेच तिथे थैमान घातले. एक पदक दाखविले तेव्हा त्या म्हणाल्या, 'हो, हे माझ्या जाईचे आहे. मुंबईहून हरि केशव गोखल्यांच्या दुकानातून आणले आहे. माझ्या भाचीचे तसेच होते म्हणून मुद्दाम तसेच आणले.' प्रत्येक वस्तूला इतिहास आहे.

माडगूळकरांनी त्यांच्या आईबद्दल लिहिताना ती प्रत्येक वस्तूचा इतिहास सांगायची असे लिहिले आहे. माडगूळकरांच्याच आईचे काय प्रत्येक गृहिणीचा तिच्या संसारातील प्रत्येक वस्तूचा इतिहास असेल !

या उत्तरांमुळे कालचा एक प्रश्न अत्यंत चुकीचा वाटला. वकिलांनी अभ्यंकरांना लाइटरच्या खाणाखुणा, लांबी-रुंदी विचारली.

घरात कोणी स्मोकिंग करीत नाही, हे उत्तर काढून घेतले. निकालाचा विचार करताना काय होईल ते होवो; पण आपल्या वस्तू आपल्याला नजरेने पाठ असतात. बाबा ( माझे आजोबा ) वारल्याला अकरा वर्षे झाली. त्यापूर्वी अडतीस वर्षे त्यांनी स्मोकिंग सोडले होते. तरीही त्यापूर्वीच्या म्हणजे एकूणपन्नास वर्षांपूर्वीच्या अॅश ट्रे, पाइप, तंबाखूच्या पेटचा या वस्तू आमच्या घरात पडून आहेत. त्यांचे वर्णन मला सांगता येणार नाही; पण हजार वस्तूंतूनही मी त्या ओळखेन ! अर्थात अशा प्रसंगात माझ्यावर वस्तू ओळखण्याची वेळ येऊ नये.

अभ्यंकरांच्या पत्नीने उलटतपासणीत अशी काही झकास उत्तरे दिली की, उपस्थितांपैकी एक म्हातारा खूष होऊन टाळ्या वाजवीत होता. माडीवाले त्याला म्हणाले, 'अहो, हे कोर्ट आहे. शनिवारवाडा वाटला का ?' त्यावर म्हातारा खवळला 'मी शिक्षा भोगेन हवी तर. मला उत्तर अॅप्रिसिएट करायचे आहे.' याचा अर्थ तो मनाने अतिशय गुंतून गेला असणार. आपल्या बाजूचा जय होताना पाहिला म्हणजे होणारा आनंद व्यक्त करण्यासाठी त्याची किंमत मोजायची तयारी असली पाहिजे.

नंतर पुन्हा एक झकास उत्तर आल्यावर राजूने म्हाताऱ्याला खूण केली आणि म्हणाला, 'आता वाजवा टाळ्या!' नंतर मात्र म्हातारबुवा लाजले.

२२ जून ७८ : एकोणतिसावा दिवस

अभ्यंकर पती-पत्नींच्या साक्षी मी सर्वांत चांगल्या रिपोर्ट केल्या होत्या. फार जणांनी तारीफ केली होती; पण आज विशेष म्हणजे स्वतः श्री. अभ्यंकरांनी 'सकाळ'चे रिपोर्टर कोण, म्हणून चौकशी केली. इतर—बारा तेरा बातमीदारांच्यासमोर त्यांनी माझ्या बातमीची तारीफ केली; त्यामुळे नाही म्हटले तरी सुखावल्यासारखे वाटले.

आज गाडगीळ सराफ आणि जक्कलच्या प्रेयसीची साक्ष झाली. या मुलीचे नाव किंवा पत्ता छापू नये असे ठरविले आहे.

२३ जून ७८ : तिसावा दिवस

वकिलांची प्रश्न विचारण्याची पद्धत अत्यंत अपमानास्पद असते. फार संज्ञाक्षम माणूस संतापून जाईल असे प्रश्न असतात. एखादा तरी साक्षीदार संतापेल अशी माझी अपेक्षा नाना जोशींच्या साक्षीच्या वेळी खरी ठरली. खोटेपणा सुचविणारा प्रश्न येताच हे अतिशय संतापून उत्तरे देत. इतर वेळी एक शब्दसुद्धा इकडे तिकडे होणार नाही याची ते काळजी घेत होते. सरकार पक्षाने पुरावा इतका पक्का आणि भक्कम बांधला आहे की आरोपीच्या वकिलांनी कितीही धडका मारल्या तरी एक चिरा देखील हलणार नाही !

काही जणानी कालच्या मुलीचे नाव छापले आहे. काहींनी पत्ता, तर काहींनी तिच्या वडिलांचे नाव. बातमीदार आपापसात ठरवतात आणि ठरलेले पाळीत नाहीत.

२६ जून ७८ : एकतिसावा दिवस

आजचा दिवस तसा भाकडच होता. पुराव्याला दुसरा गिलावा, तिसरा गिलावा असे प्रकार झाले.

२७ जून ७८ : ३२ वा दिवस

सराफांच्या साक्षीत प्रत्येकाने आपण बकायदा वर्तन कसे केले, हे तोंड वर करून सांगितले. पुण्यात भीषण खून झाले आहेत, दागिन्यांची यादी दिलेली आहे, अशा परिस्थितीत दागिने आटविणे, लगड घेणे असे बेकायदा वर्तन करायला यांना काहीच कसे काहीच वाटत नाही ? ज्या वेळी गावात काहीच तंग वातावरण नसेल त्यावेळी हे लोक कसे वागत असतील ? इन्कम टॅक्स, एक्साईज, पोलिस अशा सर्व खात्यांनी मिळून सराफांविरुद्ध संयुक्त मोहीम घेतली पाहिजे.

एका सराफाने साक्ष झाल्यावर एका बातमीदारामार्फत 'नाव छापू नका !' असा निरोप सांगितला. हा शुद्ध बेशरमपणा आहे. भानगडीचा व्यवहार करायचा आणि वर साळसूद राहण्याचा प्रयत्न करायचा. आमचे सहकारी तरी इतक्या निर्लज्ज कामासाठी मध्यस्थी करायला कसे धजावतात ?

२८ जून ७८ : तेहेतिसावा दिवस

आजही काही सराफांच्या साक्षी झाल्या. बेकायदा व्यवहार आणि कुणाच्या तरी लग्नासाठी बेकायदा खरेदी. अशा माणसाविरुद्ध पोलिस कारवाई कशी करीत नाहीत ?

२९ जून ७८ : चौतिसावा दिवस

बनावट पावती-पुस्तकाबद्दलचे पुरावे संपले. पोलिसांनी पुरावे फार कसून जमविले आहेत. साक्षीदार जरा इकडचे तिकडे हालत नाहीत. रोज खटल्याचा एक पदर उलगडतो आहे आणि भविष्य निश्चित होत चाललेले दिसते.

३० जून ७८ : ३५ वा दिवस

बेकायदा सोन्याचे व्यवहार केल्याचे सांगणाऱ्या आणखी सराफ-सोनारांच्या साक्षी झाल्या. एकाने तर मुलीच्या लग्नासाठी सोने घेतले म्हणून सांगितले. मुलगी वय वर्षे चार. एकूण आनंदी आनंद आहे !

१ जुलै ७८ : ३६ वा दिवस

आजचा सराफ तर आतापर्यंतच्या सराफ-साक्षीदारांचा बादशहाच होता. तन्मणी तीनशे रुपये, मंगळसूत्र शंभर रुपये आणि ताईत शंभर रुपये अशा किंमतीला खरेदी केल्याचे सांगून वर बाजारभावाने घेतल्याचे सांगतो. या दराने त्यांच्याकडून वस्तू विकत घेतल्या पाहिजेत.

या सराफाचे सोन्याचे दर गेल्या शतकातले दिसतात. त्याची उत्तरे फार मासलेवाईक होती. नागूअण्णांची आणि त्याची काही प्रश्नोत्तरे अशी—'रजिस्टरमध्ये नोंद नसल्याने तुमच्याकडून एक लाख रुपयाचे दागिने जप्त केले ना ?'

'सत्तावीस हजार रुपयांचे.'

'जप्त केले ना पण ?'

'त्यावर अपील केले आहे.'

'अपील फेटाळले ना ?'

'पुन्हा अपील केले आहे.'

'किती दागिने जप्त केले ?'

'एक किलो तीनशे ग्रॅम !'

'त्या वेळी भाव काय होता ?'

'तीनशे रुपये.' (हा भाव धरला तरी या व्यापाऱ्याकडून जप्त केलेल्या दागिन्यांची किंमत ३९ हजार रुपये होते.)

'प्रत्येक भागीदाराला सहा हजार रुपये दंड झाला ना ?'

'हे खोटे आहे.'

'दंड झाला की नाही ?'

'मी, मुलगा आणि बायको यांना हजार हजार रुपये दंड झाला.'

'हे तुमचे भागीदार आहेत ना ?'

'नाहीत.'

'तिन्हाईत आहेत म्हणून दंड झाला का ?'

'भागीदार नाहीत पण भागीदार म्हणून दंड झाला.'

'चोरीचा माल घेतल्याबद्दल तुमच्यावर खटले झाले ना ?'

'नाही.'

'दोन खटले चालू आहेत ना ?'

'हो.'

साक्षीदार काय योग्यतेचा आहे हे नागूअण्णांनी झकास दाखविले. एखाद्या जिवंत कोंबडीचे तदुरी चिकन केले तर तिला काय वाटेल ते या साक्षीदाराचे झाले असेल; पण इतके झाल्यावर बापटसाहेब म्हणाले 'अहो, हे लोक अशाच सराफाकडे जाणार.'

सरतपासणीत नागूअण्णांनी एक झकास संधी घालविली. शामरावांनी साक्षीदाराला विचारले 'तुम्ही तुमच्या दुकानात माल विकायला आलेला माणूस ओळखाल का ?' तो हो म्हणाल्यावर शामरावांनी सांगितले 'मग दाखवा बरं.' या महान साक्षीदाराने मुनावर ऐवजी जक्कलकडे बोट दाखविले. नागूअण्णा उतावळेपणे उभे राहिल्याने साक्षीदाराला चूक कळली. त्याने नाही नाही करत सुताराकडे बोट केले. पुन्हा नागूअण्णा उभे राहिल्यावर त्याने मुनावरकडे बोट दाखवले. हातात दोनदा आलेले सावज सोडून देण्यासारखा प्रकार होता.

### ३ जुलै ७८ : ३७ वा दिवस

आज अगदीच रटाळ दिवस होता. साक्षीही फालतूच झाल्या.

### ४ जुलै ७८ : ३८ वा दिवस

डॉ. फेरवानींची साक्ष झाली. जोशी आणि अभ्यंकरांकडील आठ मयतांचे पोस्टमार्टेम त्यांनी केले आहे. सगळ्या प्रकारातील साम्य त्यांनी सांगितले. 'आवाजदेखील बाहेर पडणार नाही अशा प्रकारे नरडे आवळले होते,' असा निष्कर्ष त्यांनी सांगितला. अखेरचा तडफडाटदेखील मुकपणेच झाला असणार. मरताना काय यातना झाल्या असतील ! - डॉक्टरांनी सर्व प्रेतांच्या कलर ट्रान्सफरन्सीज कोर्टाला सादर केल्या. प्रोजेक्टरही आणला होता; पण कोर्ट-हॉलमध्ये 'सदीप व्याख्यान' मात्र झाले नाही.

### ५ जुलै ७८ : ३९ वा दिवस

अभ्यंकरांच्या थोरल्या मुलीची आज साक्ष झाली. तीस-एकतीस वर्षांची तरी असावी; पण आठ-दहा वर्षांच्या मुलीसारखा निरागस आणि भाबडा चेहरा होता. केसांचे वळण आणि धारदार नाक ही आईची वैशिष्टये या मुलीत आहेत; परंतु गालाची हाडे उंच आणि गाल बसलेले, त्यामुळे खंगल्यासारखे वाटणारे, कोकणस्थी चेहऱ्यात खूपदा आढळणारे वैशिष्टय या मुलीच्या चेहऱ्यात होते. साक्ष साधारण आई-वडिलांच्या साक्षीतल्या माहितीला दुजोरा देणारी किंवा अधिक पक्का पुरावा देणारी होती.

या मुलीला नऊ महिन्यांची एक मुलगी आहे, असे तिच्या साक्षीवरून दिसते. या तान्ह्या मुलीचे नाव 'जाई' ठेवले असेल का ? ती जाईसारखी दिसत असेल का ? असे अनेक विचार मनात आले; पण हे कोणाला विचारणार ?

उत्तरे देण्याच्या पद्धतीवरून ही मुलगी बुद्धिमान असावी यात शंका नाही; परंतु एकंदर अभ्यंकर-कुटुंबाच्या बुद्धिमत्तेत ती जरा मागेच असावी असे तिने 'बी. एस्सी. (होम-सायन्स) आणि संगीताचे शिक्षण' वगैरे स्वतःविषयी दिलेल्या माहितीमुळे वाटले.

वस्तू ओळखताना तर या मुलीची साक्ष फिल्म घेण्यासारखी झाली. वस्तू दाखविताच 'आपली कायमची हरवलेली गोष्ट अचानक पुढे आल्यासारखा' आनंद तिच्या चेहऱ्यावर दिसत होता. तिच्या चेहऱ्यावर जे भाव दिसत होते, या वस्तूंबद्दल 'काय सांगू आणि काय नको' असे वाटून तिची उत्तर देताना जी गडबड उडत होती ती वर्णन करण्यापेक्षा व्हिडिओ टेप किंवा दुसऱ्या ऑडिओ व्हिज्युअल माध्यमामार्फतच नोंदविणे शक्य झाले असते. या वेळी तिच्या चेहऱ्यावर दिसणारा निरागसपणा अवर्णनीय होता. या मुलीची उलटतपासणी मध्येच थांबवून पुढे घ्यावी अशी आरोपीच्या वकिलांनी मागणी केली. त्या वेळी अभ्यंकरांच्या शेजारी बसलेल्या तरुणाने-बहुधा तो त्यांचा जावई असावा, असे त्याच्या एकूण अॅपिअरन्समुळे वाटले-अभ्यंकरांच्या मुलीला नाही अशी दटावल्यासारखी खूण केली. कोर्टाच्या कामाशी त्याचा कधीच संबंध आलेला नसावा. कारण साक्ष पुढे ढकलणे हे त्याच्या किंवा साक्षीदार मुलीच्या इच्छेवर अवलंबून नव्हते.

या साक्षीत आणि आधीच्या साक्षीत आलेल्या बहीण-भावंडांच्या पत्रव्यवहाराचा उल्लेख पहाता एक विचार मनात आला की, महामहोपाध्याय वासुदेवशास्त्रींची पतवंडे आणि महामहोपाध्याय काशिनाथशास्त्रींचा नातवंडे आपापसात इंग्रजीत पत्रव्यवहार करतात. कसली आली परंपरा आणि कसले काय, एका पिढीत इतके बदल झाले तर भारतीय भाषा जगविण्याचे प्रयत्न कसले टिकणार ? राज्यकर्त्या वर्गाची इंग्लिश, त्यानंतर इंडिश, त्यानंतर मराठीश, कन्नडीश आणि शेवटी भारतीय भाषांत बोलणारी गरीब बिचारी जनता !

### ६ जुलै ७८ : चाळिसावा दिवस

अभ्यंकरांच्या मुलीची उलटतपासणी आज संपली. आज अभ्यंकरांचे शेजारी अरविंद गोविंद रड्डी यांची साक्ष झाली. रड्डी-कुटुंब अभ्यंकरांसारखेच आहे. रंगाचार्य रड्डी संस्कृत पंडित होते. नयनतारा बंगल्यावर गो. रं. रड्डी, आय. ए. एस्. अशी पाटी दिसते. म्हणजे या तीन पिढया असाव्यात. अरविंद रड्डी जंगलखात्यात

अखिल भारतीय सेवेत आहेत.

या सर्वांचा अर्थ असा, 'गरीब अधिक गरीब होतात' या कम्युनिस्टांच्या सिद्धांताप्रमाणे 'बूर्ज्वा अधिक बूर्ज्वा होत जातात' असेही म्हणायला हरकत नाही. ब्राह्मणवर्ग सुमारे हजार वर्षांपूर्वी राज्यस्थापना करू लागला. पुढे धार्मिक क्षेत्रातील वर्चस्वाप्रमाणेच मादण्णा, अक्कण्णा, विठ्ठल सुंदर, पुरंदरे, पानसे वगैरे मंडळी राज्यकारभारात वजन निर्माण करू लागली. पेशव्यांबरोबर कोकणस्थांचा उदय झाला. आधी फार्शी-संस्कृत शिकणारा ब्राह्मणवर्ग एल्फिन्स्टनच्या काळात इंग्रजीकडे वळला. स्वातंत्र्यपूर्वकाळातच हे लोक मुलकी नोकऱ्यांत मोक्याच्या जागांवर गेले. स्वातंत्र्यानंतरही ती स्थिती टिकली तेवढी टिकवली. पुढे डॉक्टर, इंजिनियर अशा क्षेत्रांकडे वळले. एकंदर काय, वर्ग म्हणून ब्राह्मणसमाज चलतीच्या दिशेला जात राहिला. परंपरा वगैरे झूट.

## १० जुलै ७८ : एक्केचाळिसावा दिवस

चारही आरोपींना अभ्यंकरांच्या बंगल्यात शिरताना पाहिले, असे सांगणाऱ्या नागेश कर्वे या साक्षीदाराची साक्ष झाली. 'येणार, येणार' असा या साक्षीबद्दल सरकार पक्षाचा बराच ओरडा चालू होता. साक्षीत तसा दम काही नाही. 'रिकाम्या जागा भरा' इतपतच. मात्र 'हब मोडला होता' आणि 'पहिली काडी विझल्याने दुसरी काडी पेटविली,' या दोन उत्तरांमुळे 'उतारावरून गाडी ढकलली कशासाठी' आणि 'इतक्या थोड्या वेळात आरोपीचा चेहरा कसा दिसला' या प्रश्नांना आधीच सुरुंग लावला.

## ११ जुलै ७८ : बेचाळिसावा दिवस

प्रारंभी अटक झालेला आणि नंतर मोकळा केलेला आरोपींचा मित्र सतीश गोरे याची आज साक्ष झाली. जवळजवळ संपूर्ण प्रकरणाची कथा सांगितली. त्यापैकी बराच भाग इतरांच्या साक्षीत आला आहे. 'अष्टेकरांनी वाघ सराफांना फोन केला,' 'मी जक्कलबरोबर अष्टेकरांकडे गेलो,' अशा त्याच्या विधानांना पुष्टी देणारी विधाने पूर्वीच्या साक्षीत आलेली नाहीत. याच्या म्हणण्याप्रमाणे जक्कल याच्यापासून काही गोष्टी छपवीत होता आणि काही गोष्टी मुद्दाम सांगत होता.

एकंदर साक्षीतील आशय पाहिला आणि जक्कल गोरेला माहिती देत होता हे खरे मानले तर 'गोरेला बरेच काही माहिती आहे, पण तो अपुरी माहिती देतो आहे' असे वाटते किंवा 'गोरे आपल्याकडे असणारी माहिती अतिरंजित पद्धतीने सांगतो आहे,' असे वाटते.

आज डॉ. विवेक परांजपेची साक्ष झाली. त्याची किंवा गोरेची आज उलटतपासणी झाली नाही. परांजपेला अघळपघळ बोलण्याची फार सवय आहे. उलटतपासणीत फजिती होण्याचा धोका आहे.

## १२ जुलै ७८ : ४३ वा दिवस

आज पानशेतदिन. डॉ. परांजपेचे पानशेत होणार असे आम्ही आपापसात म्हणत होतो; पण उलटतपासणीत अशी फर्स्टक्लास उत्तरे दिली की, पानशेत झाले; पण आरोपींच्या वकिलाचे! गोरेची उलटतपासणी आज अपुरी राहिली.

## १३ जुलै ७८ : ४४ वा दिवस

गोरेची उलटतपासणी आज संपली. नागूअण्णा देशपांडेंनी उपरोध, कुत्सितपणा, विनोद यांचा अक्षरशः वर्षाव केला. त्यांच्या बोलण्यातील चढ-उतार, अभिनय या गोष्टी बातमीत येऊ शकत नाहीत. त्याची फिल्म घेतली पाहिजे.

## १४ जुलै ७८ : ४५ वा दिवस

अनिल गोखलेच्या आईची साक्ष म्हणजे एक विलक्षण अनुभव झाला. दुःखावेग, शोकावेग म्हणजे काय हे प्रत्यक्ष पहायला मिळाले. अनिलच्या वस्तू पाहिल्यावर तिने जो हंबरडा फोडला तो वर्णन करणे अशक्यच झाले. हेगडेच्या आईच्या किंवा हिराबाई अभ्यंकरांच्या साक्षीचे वेळी जे आम्हाला अपेक्षित होते ते आज पहायला मिळाले. हेगडे-प्रकरणाला अडीच वर्षे उलटली आहेत. त्या मानाने गोखले-प्रकरण सर्वात ताजे. स्वतःचा मुलगा गेलेला आणि त्याच्या खुनाच्या आरोपावरून नेहमी घरात येणारी मुले पिंजऱ्यात, हे पाहून काय वाटले असेल?

सौ. अभ्यंकर आणि सौ. गोखले–दोघीही 'कुटुंब' या मध्यबिंदूभोवती फिरणाऱ्या गृहिणी; परंतु दोघी ज्या वातावरणात वावरल्या त्यातील वर्गीय फरक लक्षात घेता त्यांचा त्यांचा धीरोदात्तपणा अथवा अनावर दुःख दोन्ही स्वाभाविक वाटले.

प्रभाकर गोखले आणि जयंत गोखले यांच्याही साक्षी झाल्या. प्रभाकर गोखले साक्ष देताना अतिशय बेचैन होते. कोळसे पाटील म्हणाले, 'आम्हीही माणसेच आहोत. आम्हाला दुःख समजते; पण पाच–पाच माणसे ज्यांच्याकडे गेली आहेत ते लोक इथे येऊन गेले आहेत; फार इमोशनल होऊ नका!' गोखले लगेच संतापून म्हणाले, 'पण माझा मुलगा प्रथमच गेला आहे ना!' कोळसे पाटील खरे तर असे कधी बोलत नाहीत. आज कसे बोलले कोण जाणे.

जयंत गोखलेच्या साक्षीच्या वेळी त्याच्या नजरेत असणारा संताप, चीड, जळजळ लिहून व्यक्त होणे शक्यच झाले नाही.

आज संध्याकाळी एक ओळखीच्या बाई भेटल्या. आज त्या कोर्टात आल्या होत्या. आरोपींच्या नातेवाईकांपाशीच बसल्या होत्या. संध्याकाळी त्यांनी मुद्दाम थांबून आपण मृतांपैकी 'अमक्याची अमुक' असल्याचे सांगितले. तसे आम्ही एकमेकांना अनेक वर्षे ओळखतो; पण आम्ही एकमेकांना माहिती झालो तेव्हा मी कॉलेजात जाणारा उनाड तरुण होतो आणि त्यांना नुकतीच वयात येणारी मुलगी होती. अशा स्थितीत ओळख निर्माण होणे शक्यच नव्हते; पण आजचे त्यांचे मुद्दाम थांबणे हे 'माझा आरोपींशी ओळखीनेही संबंध नाही,' हे दाखविण्यासाठी असावे.

## १५ जुलै ७८ : ४६ वा दिवस

आजचा दिवस अगदी बोअर होत चालला होता; पण शेवटच्या पंचाच्या साक्षीत 'वही पाण्यातून काढली,' या मुद्द्यावर नागूअण्णांनी मजा आणली. सरकारी पुराव्याप्रमाणे अनिल गोखलेची वही आठ दिवस नदीत होती, असे आहे. त्यामुळे नागूअण्णांनी लगेच इंद्रायणीतून वर आलेल्या तुकारामगाथेचा पोलिसांना थप्पड मारायला उपयोग केला.

१७ जुलै ७८ : ४७ वा दिवस

अभ्यंकरांना दारात दिसलेल्या ' अनोळखी ' तरुणाची साक्ष झाली. ' आम्ही काही केलेले नाही. अभ्यंकरांना दारात दिसलेल्या अनोळखी तरुणानेच खून केले असतील, ' हा संभाव्य बचावाचा मार्ग या साक्षीने बंद झाला. वाघ-शेळ्यांच्या खेळात जसे एकएक घर काबीज करीत वाघांना कोंडतात तसे आरोपींना कोंडत कोंडत आणले आहे. त्यांचे संभाव्य युक्तिवाद आधीच बंद केले आहेत. आता हे वाघ कोंडणार, का खेळात होते तसे सुटणार इतकेच पहायचे.

अनिलचे पोस्टमार्टेम करणाऱ्या डॉक्टरची साक्ष झाल्यावर माझी ट्यूब पेटली की, ' तो जाताना बटाटेवडे खाऊन गेला ' हे वाक्य वारंवार का आले ? अन्नपचनावरून मृत्यूची वेळ कळण्याच्या मुद्द्याला बटाटेवडे हवे असतील. सरकारी वकिलांना कुठले धागे कुठे जोडायचे याचे काय प्लॅनिंग करावे लागत असेल !

आजचा एक साक्षीदार म्हणजे जगातला सर्वांत मठ्ठ माणूस असला पाहिजे. मठ्ठपणा, बावळटपणा आणि घामटपणा यांचा त्रिवेणीसंगम होता. बाकी करमणूक बरी झाली.

१८ जुलै १९७८ : ४८ वा दिवस

गोखले प्रकरणात आरोपींनी ' अनिल गोखलेला मोटारसायकल-वरून नेले, ' असे सांगणाऱ्यांच्या साक्षी झाल्या. काल अशाच दोन साक्षीदारांच्या साक्षी झाल्या. आरोपींची प्रत्येक हालचाल पाहणारे साक्षीदार आणणार आहेत की काय कोण जाणे.

१९ जुलै १९७८ : ४९ वा दिवस

जक्कलचा मित्र आनंद वझे याची साक्ष झाली. हा शेवटचा प्रत्यक्ष साक्षीदार. अनिल गोखले खून-प्रकरणाच्या दिवसाची बरीच हालचाल याच्या साक्षीतून स्पष्ट झाली. तसा हा पुरावा पूर्वी झाला होता. आज पुष्टी दिली इतकेच. हा साक्षीदार दिसायला अतिशय देखणा होता. आधी काही देखणे साक्षीदार आले होते; पण त्यांच्यात बायकी छटा होती. याचे मर्दानी सौंदर्य वाटले.

२० जुलै ७८ : पन्नासावा दिवस

वझेची उलटतपासणी संपली. पन्नास दिवसांत फक्त १६८ साक्षी झाल्या. खरे तर केमिकल अॅनलायझरची साक्ष अर्धवट राहिली. पंधरा ऑगस्टपूर्वी खटला संपण्याची शक्यता दिसत नाही. केमिकल अॅनलायझर पै यांनी ' जोशी-अभ्यंकर–बाफना प्रकरणातील तोंडात कोंबलेले बोळे आणि टपरीत मिळालेले कापडाचे तुकडे हे एकाच नेहरू शर्टाचे तुकडे आहेत, ' असे सांगितले. ' केमिकल अॅनलायझर आल्यावर सर्व प्रकरण एकाच कटाचा भाग होता हे पटेल, ' असे इन्स्पेक्टर कदम म्हणत असत ते याच संदर्भात असावे.

आमचे काही सहकारी या पैमहाराजांकडे गेले आणि ' तुमची साक्ष समजावून द्या ' असे म्हणू लागले. न समजण्यासारखे खरे त्यात काहीच नव्हते. साक्षीदार म्हणाला ' मी कोर्टाला सांगायला बांधलेलो आहे. तुम्हाला सांगण्याची जबाबदारी नाही. ' जाताजाता कोणी तरी फाडकन मुस्काडीत द्यावी तसे आमच्या सहकाऱ्यांना झाले असणार. साक्षीदाराचे म्हणणे खरे होते; पण इतका शिष्टपणा सहसा कोणी करीत नाही.

२१ जुलै ७८ : ५१ वा दिवस

केमिकल अॅनलायझरची साक्ष चालूच आहे. आज आमची जाण्याची वेळ आली होती. उंबऱ्या गणपती चौकात बाजूला लावलेली मोटार-सायकल काढत होतो. हिरवा दिवा आहे तेवढ्यात चौक ओलांडून जाऊ, असा विचार करून निघालो तर एकजण धावत धावत चौकात आला आणि म्हणाला, ' काय भिडे, काय होईल? ' तेवढ्यात पिवळा दिवा लागला. पुढचा स्कूटरवाला थांबला. मागचा स्कूटरवाला माझ्यावर धडकला आणि मी खाली पडलो अन् ब्रेक दाबत बस तिथेच थांबली. काही इंचांनीच जीव वाचला; नाही तर उद्याच्या अंकात ' कवटी फुटून मेंदूच्या चिंधड्या उडाल्या होत्या, ' असे वर्णन आले असते.

मी मागच्या स्कूटरवाल्यावर डाफरलो. ' काय रे भडव्या, समोर बघून गाडी चालवता येत नाही का ? पोरीकडे बघत गाडी चालव आणि दुसऱ्यांचे जीव घे! ' स्कूटरवाला पोरगा गांगरला. त्याची तशी फारशी चूक नव्हती. खरे म्हणजे वाटेत हटकणाऱ्या माणसालाच ' भडव्या ' म्हणण्याची इच्छा होती. हा माणूस मला रोज कुठे तरी भेटतो. एकदा तर एका मयतीला स्मशानात भेटला होता. भेटल्यावर ' काय भिडे, काय होईल ?' हाच प्रश्न. मग मी देखील ' हमखास फाशी ', ' हमखास निर्दोष ', ' अजून काही सांगता येणार नाही ', अशी उत्तरे देतो. रोज बदलत्या उत्तराचेही या प्राण्याला काही वाटत नाही.

२४ जुलै ७८, ५२ वा दिवस.

केमिकल अॅनलायझर संपला.

२५ जुलै ७८ : ५३ वा दिवस.

सुरेश देशमुखांची साक्ष झाली. पुण्यातील भीतीच्या काळात गस्त घालण्याचा विचार त्यांनी बोलाविलेल्या सभेत मांडला गेला होता. त्या वेळी ' तुम्ही काहीही करा. सभा घ्या नाही तर गस्त घाला. आम्ही करायचे ते करणारच, ' असे त्यांना पत्र आले होते. त्या संद-र्भात साक्ष झाली.

२६ जुलै ७८ : ५४ वा दिवस.

ओळखपरेड घेणाऱ्या आणखी एका मॅजिस्ट्रेटची साक्ष झाली. यांनी चांगली साक्ष दिली. मागच्या मॅजिस्ट्रेटनी बरीच गंमत आणली होती.

२७ जुलै ७८ : ५५ वा दिवस

हस्ताक्षरतज्ज्ञ फणसळकरांची साक्ष सुरू झाली. हेगडेच्या वडि-लांना पाठविलेली चिठ्ठी, दागिने विकताना सोनाराला दिलेली पावती ही जक्कलच्याच अक्षरात आहे, असे ते म्हणाले.

२८ जुलै ७८ : ५६ वा दिवस

फणसळकरांची उलटतपासणी संपली. एक एक अक्षर घेऊन प्रत्येक वळणाबद्दल प्रश्न झाल्याने दिवस फार कंटाळवाणा गेला.

**२९ जुलै : ५७ वा दिवस**

ससूनचे सुपरिंटेंडेंट डॉ. बी. एन्. वैद्य साक्षीला आले होते. ते नागूअण्णांचे जावई. त्यामुळे शामराव सारखे म्हणायचे ' नागूअण्णा तुमचे जावई येतील तेव्हा त्यांची उलटतपासणी घ्या ! ' पण नागूअण्णा आज आलेच नाहीत. फौजदारांच्या साक्षी सुरू झाल्या.

आज×××आरोपीचे घरच्या लोकांशी भांडण झाले. तो पैसे मागत होता आणि घरचे लोक पैसे नाहीत, म्हणत होते. शेवटी तो तो म्हणाला ' इतके पैसे दिले त्याचे काय केलेत ? ' हे वाक्य ऐकल्यावर अंगावर सर्रकन काटा आला. या वाक्याचा अर्थ असा की, आरोपी घरच्या लोकांना वेळोवेळी पैसे आणून देत होता. ते त्याला सामील असले पाहिजेत. आलेला पैसा वापरताना सगळे असतील. पापाचा धनी मात्र तो एकटाच !

वकिलांना मी विचारले, ' काय हो, कोर्ट उठले म्हणून काय झाले ? इतक्या पाच-पन्नास लोकांच्या समोर तुमचा आरोपी असे कसे बोलतो ? ' -

वकील म्हणाले, ' कायद्याचा प्रश्न म्हणाल तर तो इथून नेताना रस्ताभर मीच खून केले असे म्हणाला तरी उपयोग नाही; पण ते सगळ्या गोष्टी कबूल करतात. पुराव्यातल्या कुठल्याही गोष्टीबद्दल विचारले की सांगतात, ' हे खरे आहे '. उगाच काही तरी बारीक सारीक तपशील वेगळा सांगतात. ' पुराव्यातल्या गोष्टी खोट्या आहेत, खरे असे होते, असे काही म्हणाले तर काही तरी मार्ग निघतो; पण इथे मार्गच नाही. काळाकभिन्न खडकच दिसतो ! '

मी म्हणालो, ' खरे असले तर असू दे, बचावाला काही तरी मार्ग सापडत नाही का ? '

त्यावर वकील म्हणाले, ' कोर्टापुढे येणाऱ्या नव्व्याण्णव टक्के केसेस खऱ्या असतात. पोलिस अत्यंत ढिले राहतात, बेफिकिरीने कामे करतात म्हणून पुराव्यावर हल्ला करणे सोपे जाते. अनेकदा प्रकरण खरे असते; पण मांडताना काही तरी थातुरमातुर पद्धतीने मांडतात आणि स्टोरी सुसंगत व्हावी म्हणून काही तरी बनावट पुरावा, साक्षी आणतात. बनावट कहाणी असली की फॅक्टला मुळातच धक्का देता येतो. इथे येईल ती गोष्ट खरी आहे, असे आरोपी म्हणायला लागले तर आम्ही तरी काय मार्ग काढणार ? '

' म्हणजे तुम्ही आशा सोडली की काय ? '

' छे, छे, आशा कसली सोडतोय ! नेहेमी इतके नसले तरी इथेही पोलिस बेफिकीर आहेतच. चिरेबंदी पुराव्याचा डोलारा डळमळीत होईलच. आशा कधीच सोडायची नाही. '

( अपूर्ण )

हे पुस्तक प्रत्येक ग्रंथालयात जाईल अशी व्यवस्था करण्यासाठी शासनाने आवर्जून प्रयत्न करावेत.

( रविवार केसरी दि. १० सप्टेंबर १९७८ )

–डॉ. वा. ना. कुबेर

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन,
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३०.

पुस्तके

# वास्तव रामायण

## रामायणातील स्थल-कालावर नवा प्रकाश

गर्भश्रीमंत, वयाने तरुण नि व्यवसायाने शल्यचिकित्सक असूनही अध्यात्मिक संशोधनाचा जबरदस्त छंद असलेल्या डॉ. प. वि. वर्तक यांचे 'वास्तव रामायण' हे पुस्तक भयंकर छान नि अपूर्व आहे, असे ऐकले होते. योगायोगाने ते हाती आले. ते आत-बाहेर अगदी उत्सुकतेने पाहिले.

मलपृष्ठावरच प्रकाशकांनी ग्रंथ नि ग्रंथकर्ता यांची वारेमाप स्तुती केलेली आढळली; पण हे जाहिरात युग आहे ना? तेव्हा चालू युगाच्या आचारसंहितेप्रमाणे ते योग्यच आहे. लेखक मंगळावर भ्रमण करून आलेला असो, नाही तर आधुनिक साक्षात्कारी संत असो, पुस्तकाचे बरे-वाईटपण त्यावर थोडेच अवलंबून आहे?

हा पंधरा-प्रकरणी ग्रंथ आहे केवळ २९२ पानांचा. तरी एका बैठकीत तो कसचा संपतो? पंधरा दिवस घेतले त्याने! 'या ग्रंथात खूप संशोधन ठासून भरलेले असून त्यासाठी मी अपार कष्ट उपसले आहेत,' असे लेखकाने आपल्या 'मनोगता'त स्वत: नसते सांगितले तरी ग्रंथ वाचणाऱ्याच्या ते ध्यानी येतेच; पण त्याबरोबरच अशा संशोधनात्मक लेखनात जो समतोलपणा असायला हवा तो तितकासा नाही; तसेच लेखकाची इतर लेखक-संशोधकांविषयीची दृष्टी निरागस नाही, हेही प्रत्ययास आले. साक्षात्कारी संत असे कसे लिहितो, असे उगीचच वाटले; पण 'हे संत 'आधुनिक' आहेत, चालायचंच,' असे आतून उत्तर आले!

पण डॉ. वर्तकांचा रामायणाचा अभ्यास सखोल आहे. राम, सीता, भरत हे असे असे होते, असे जेव्हा जेव्हा बोलले-लिहिले जाते तेव्हा ते कशाच्या आधारावर, हे पहाताना अध्यात्म-रामायण, भावार्थ रामायण, आनंद रामायण, तुलसी रामायण इत्यादि विविध रामायणांचा मूलाधार जे 'वाल्मीकि रामायण', त्याचा मूळ संस्कृतावरून अभ्यास केलेला असावाच लागतो; पण लेखकाने भाषांतरावरच काम भागविले आहे!

तसेच 'वाल्मीकि रामायण' प्रथम केव्हा लिहिले गेले, आज ते जे उपलब्ध आहे ते मूळच्या स्वरूपात आहे का? असेल तर उत्तम; पण नसल्यास आज वाल्मीकि रामायणाची कोणती प्रत प्रमाणभूत मानायची, हा दुसरा प्रश्न येतो. पण 'कुठले रामायण, कुठली प्रत या वादंगात मला शिरायचे नाही,' अशी त्यांची प्रतिज्ञा आहे. 'रामायणात जो गोळाबेरीज मजकूर सापडतो त्यावरून मी अंदाज केले आहेत,' असे त्यांनीच स्वत: म्हटलेले आहे.

रामायणाच्या अभ्यासकापुढे आणखीही एक प्रश्न उद्भवतो. रामायणात उल्लेखिलेली अयोध्या, पंचवटी, सेतु, लंका इत्यादि स्थळे आज ज्या ठिकाणी दाखविली जातात तेच त्यांचे मूळ स्थान आहे की नाही, हेही पाहावे लागते.

### संशोधित निष्कर्षांचे खंडन

डॉ. वर्तकांचे वैशिष्टय असे की, त्यांनी 'वास्तव रामायणात' या सर्व प्रश्नांचा सविस्तर परामर्श घेतला आहे. रामायणावर चिकित्सक अभ्यासात्मक ग्रंथ याआधीही झालेले आहेत. कै. भारताचार्य चिं. वि. वैद्य यांचे इंग्रजी 'दि रिडल् ऑफ् दि रामायण,' राजापूर-संस्कृत-पाठशालेचे मुख्याध्यापक कै. श्री. पाटणकर यांनी 'महाराष्ट्रीय' ह्या टोपण नावाने लिहिलेले 'श्रीरामायण-समालोचना', कै. बाळशास्त्री हरदास यांचे 'वाल्मीकि रामायण', श्री. भास्करराव जाधव यांचे 'रामायणावर नवा प्रकाश' आणि श्री. नावलकर यांचे 'ए न्यू अप्रोच टू रामायण' असे बरेच ग्रंथ गेल्या अर्ध शतकात प्रकाशित झालेले आहेत; पण डॉ. वर्तकांनी 'वास्तव रामायण' लिहून तथोक्त संशोधकांच्या संशोधित निष्कर्षांचे खंडन करून रामायणातील स्थल-कालनिर्देश पक्के केले आहेत.

'पाताळ' म्हणजे अमेरिकाच, हे संशोधन तसे नवे नसले तरी वर्तकांनी बरेच नवे आधार दिले आहेत. 'हिस्टरी ऑफ मेक्सिको' नि 'मेक्सिकन् आर्केऑलॉजी' या ग्रंथांतील आधारांवरून मेक्सिकोत प्रथम स्थायिक झालेले लोक तिथे भारतातूनच गेलेले होते; मध्य अमेरिकेत 'कोपन' येथे कोरलेली भारतीय हत्तीची मूर्ती, मध्ये सूर्य नि भोवती चार युगांची माहिती कोरलेले मेक्सिकोच्या मंदिरातील 'अॅस्टेक कॅलेंडर'; प्रेताचे दहन करण्याची पद्धती, दरवर्षी श्राद्ध करण्याची प्रथा; अमेरिका, मेक्सिको व पेरू येथे साजरा होणारा दसरा म्हणजे सीता-राम-उत्सव; पानाला चुना लावून तो विडा खाण्याची अमेरिकेतील भारतीय प्रथा इ. इ. सर्वसामान्य वाचक कंटाळेल इतक्या विविध नि विपुल पुराव्यावरून पाताळ म्हणजे अमेरिकाच, हे डॉ. वर्तक यांनी सिद्ध केले आहे. पाश्चात्यांच्या सहेतुक विपर्यस्त इतिहास-लेखनावरून ज्यांचे पूर्वग्रह बांधले गेले आहेत असे भारतीय संशोधक, डॉ. वर्तकांचे निष्कर्ष उघडपणे इतक्यात मानणार नाहीततही; पण डॉ. वर्तक हे उत्साही तरुण आहेत. त्यांनी आपले निष्कर्ष पुन्हा पुन्हा लेख नि व्याख्यान-द्वारा मांडून प्रचाराचा धोशा लावला तर त्यांचे सिद्धान्तही विद्वन्मान्य होतील. उदा. लंकेचा स्थल-निर्णय करताना केवळ सत्यान्वेषणाची दृष्टी ठेवून वर्तकांनी डॉ. सांकलियासारख्या लब्धप्रतिष्ठित संशोधकाचे आधार कसे बिनबुडाचे आहेत, हे सडेतोडपणे दाखवून सीलोन हीच लंका हा आपला सिद्धान्त मांडला आहे.

पण लेखकाने संशोधनाचे कष्ट उपसण्याची पराकाष्ठा केली असेल तर ती राम नि रामायण यांचा 'काळ' ठरविण्यात. महर्षी वाल्मीकि नि राम हे समकालीन होते, हे रामायणातील पहिल्या कांडाच्या पहिल्या सर्गातील दुसऱ्याच श्लोकावरून स्पष्ट होते. 'सध्या असा असा गुणवान मनुष्य कोण आहे,' असा प्रश्न असून एकमात्र रामच आहे, असे त्याच सर्गात उत्तर आहे. नंतर व्याकरणकार पाणिनि, भाष्यकार पतंजलि, रामायण-विषयक महाभारतातील उल्लेख, ऋतू व

चांद्रमास, इंद्र–रुद्र–वायु–पूषा–यम इ० वैदिक देवतांनाच सीता, मारुती हे वंदन करतात ही गोष्ट, सीता–कौसल्या यांच्या संध्या–होमहवन इत्यादींचे उल्लेख, सतीच्या चालीच्या अनुल्लेख, वर्षारंभ, आकाशवर्णनाचे बलवत्तर प्रमाण, ग्रह नि तारे यांना भारताने दिलेली अन्वर्थक नावे इत्यादींचा कालनिर्णयार्थ चांगला उपयोग डॉ. वर्तकांनी केला आहे.

### लो. टिळक भ्याले ?

पुष्यनक्षत्रावर सूर्य मावळण्याचे एक विधान ( पृ. २४१ ) मात्र चुकीचे आहे. रामायणात ३-१६-२ या ठिकाणी 'प्रभातायां शर्वर्याम्' असे शब्द आहेत. त्यामुळे 'सूर्य मावळल्यावर आकाशाकडे बघत असता लक्ष्मणाला पुष्यनक्षत्र दिसले असावे,' हे लेखकाचे विधान निराधार ठरते. मंगळाने ग्रासलेल्या रोहिणीचा सात वेळा रामायणात उल्लेख केलेला आहे. त्यावरून केलेले अनुमान मात्र सबळ आहे. मंगळकृत रोहिणीशकट-भेदाचा काळ ७७०० वर्षांपूर्वीचा. त्या अर्थी इ. स. पूर्वी ७७०० वर्षे रामायण झाले असावे.

उत्क्रांतिशास्त्र नि प्राणिशास्त्र यांचाही कालनिर्णयार्थ उपयोग केला आहे. उदा. सीतेला रामाचे वर्णन करून सांगताना मारुती रामाच्या चार-चार दाढांचा उल्लेख करतो ( सुंदरकाण्ड ३५ 'चतुर्दंष्ट्रः' ). हा चार दाढांचा उल्लेख सुमारे १० हजार वर्षांपूर्वीचा काळ दाखवितो. अशा तर्कात १-२ हजार वर्षे अलीकडे-पलीकडे होऊही शकतात. तथापि यात 'दाढांच्या संख्येचाही' कालनिर्णयाकडे उपयोग करून घेण्याची 'संशोधकी दृष्टी' ही महत्त्वाची आहे.

तथापि याच कालनिर्णयाच्या शेवटी बालकांडातील ( सर्ग ३९ श्लो. ५ ) 'हिमवान् अचलोत्तमः विन्ध्यश्च स्पर्धया अन्योन्यं यत्र देशे निरीक्षताम्' ( पृ. २४८ ) या श्लोकातील हिमालय नि विंध्य यांच्या स्पर्धेवरून 'गणितावरून निघणारा रामायणाचा आठ लाख वर्षांपूर्वीचा काल' स्वतःच डावलून डॉ. वर्तकांनी इ. स. पूर्व ७४०० हा रामायणकाल का बरे निश्चित केला ? इतका प्राचीन काल असला तरी 'गणिताने दाखविलेला काल मानायला कुणालाही भीती वाटायचे कारण नाही. सत्यशोधनात कसली आहे भीति,' ( पृ. २१९ ) असे अभयवचन देणारे वर्तक स्वतः भितील कसे ? 'इ. स. पूर्व २३,७२० वर्षे उत्तराभाद्रपदाच्या आरंभी वसंतसंपात होता. त्या वेळी वेद लिहिले असले पाहिजेत हे नक्की...पाश्चात्य पंडित त्या वेळी वेदकाळ इ. स. पूर्व ८०० ते १००० वर्षे मानीत. या पार्श्वभूमीवर टिळक-दीक्षितांना इ. स. पूर्व २३,७२० वर्षे प्राचीन काळाची भीती वाटणे शक्य होते. निदान पारतंत्र्याच्या त्या काळात नक्कीच भीती वाटत होती. म्हणूनच हा काळ बाजूला सारण्यासाठी त्यांनी ओढून-ताणून अर्थ लावून वसंतसंपात मृगावर आणून बसविला व स्पष्ट बोलणाऱ्या ऋचा बाजूला ठेवल्या.' पुढे 'लो. टिळकांचा अधिक्षेप करण्यासाठी हे लिहिलेले नाही. केवळ सत्यशोधनाच्या भूमिकेतून हे लिहिलेले आहे,' अशी सफाई लेखक करतात; पण 'लोकमान्य टिळक' आणि 'भ्याले' हे दोन शब्द एकत्र येतीलच कसे ? 'एखाद वेळी केसरी कुत्र्याला भिईल; पण 'केसरी'कार लोकमान्य टिळक हे गणितावरून निघणारा वेदांचा अतिप्राचीन काळ स्वीकारायला भ्याले, असं म्हणणाऱ्याचे 'डोके ठिकाणावर आहे का ?' असे टिळकांच्याच शब्दात कोणीही विचारील ! अस्तु.

पुढे 'काही शंका, काही आक्षेप' ह्या प्रकरणातील सर्वच चर्चा उद्‌बोधक आहे. अन्ती, अणुवस्तुमान C14 यावरून निष्कर्ष काढणे अशक्य. कारण रामायणकालीन एकही वस्तु आज उपलब्ध नाही, असे सांगून, शेवटी 'रायायणकालनिर्णयार्थ आपण वापरलेल्या पद्धतींचे व निर्णित कालाचे कुणी खंडन केले तरी मला आनंदच होईल,' असे खऱ्या संशोधकास साजेसे उद्‌गार काढून डॉक्टर वर्तकांनी सर्व संशोधकांना आवाहन करून ठेवले आहे.

पण हे सर्व संशोधन झाले विद्वानांसाठी. सामान्य वाचकाला त्यात गोडी नाही. 'वास्तव रामायण' राम-सीता, कौसल्या-कैकयी, भरत-लक्ष्मण इत्यादींविषयी काय म्हणते ते तो उत्सुकतेने वाचणार. त्यामुळे रामायण पूर्वकालीन इतिहास सांगणारी पहिली तीन प्रकरणे तो हनुमान-उडी मारून ओलांडणार. 'रावण पहिला' हे चौथ्या प्रकरणाचे नाव सूचक असले आणि रामाकडून मारला गेलेला रावण त्रेतायुगातला शेवटचा, हे सत्य असले तरी, सामान्य वाचक त्यातले 'रामाने रावणाला मारले,' एवढे सत्य आहे ना, हेच पाहणार.

या दृष्टीने कौसल्येविषयी एक विपर्यस्त ग्रह निष्कारण बनविणारी गोष्ट 'सत्य–कथा' म्हणून सांगून लेखकाने वाचकांस खरोखरच 'धक्का' दिला आहे; पण याच्या दुःखद जाणिवेने आपल्या 'मनोगतात' (पृ. ११ ) लेखकाने आवाहन केलेच आहे की, 'या श्लोकांचा दुसरा अर्थ लावता आला तर तो मी मान्य करीनच.'

### अर्थाचा अनर्थ

ज्या श्लोकात ही धक्कादायक गोष्ट आहे त्यांचा खरा अर्थ लक्षात न आल्याने हा प्रमाद घडला आहे; पण ग्रंथारंभी लेखक-परिचयात 'त्यांनी संस्कृतच्या परीक्षा दिल्या,' असे आहे. तेव्हा अर्थाच्या या चुकीमुळे कौसल्येला दुष्ट, अत्याचारी, सवतीचा खूप छळ करणारी असे असत्यच सत्य म्हणून सांगण्याचा घोर प्रमाद क्षम्य कसा ठरेल ? मूळ श्लोक असे आहेत. ( पृ. ४० )

'निःसंशयं मया मन्ये पुरा वीर कदर्यया ।
पातुकामेषु वत्सेषु मातृणां
शातिताः स्तनाः ॥' २·४३·१७
'नूनं जात्यन्तरे तात स्त्रियः
पुत्रैर्वियोजिताः ।
जनन्या मम सौमित्रे, तद् अद्यैतद्
उपस्थितम् ॥ २·५३·१९

याचे पुस्तकात दिलेले चुकीचे भाषांतर असे आहे – कौसल्या दशरथाला म्हणते, 'हे वीर, पूर्वी मी निःसंशय शूद्रपणे वागून बालके स्तनपान करण्याची इच्छा करीत असताना त्यांच्या मातांचे स्तन कापून टाकले आहेत.' पुढे राम लक्ष्मणाला सांगतो, 'माझ्या मातेने खरोखरच जन्मांतरी काही स्त्रियांचा पुत्रांशी वियोग घडविला आहे त्यामुळेच हे दुःख तिला प्राप्त झाले आहे.' आणि लगेच रामावरही असत्य भाषणाचा आरोप करून लेखक लिहितात की, 'जात्यन्तरे' हा शब्द वापरून ( आपल्या अत्याचारी आईला ) सावरून घेण्याचा रामाने प्रयत्न केला आहे.'

यात 'मन्ये', 'पुरा' आणि 'नूनं' ह्या तीन शब्दांकडे योग्य लक्ष न दिले गेल्यानेच अर्थाचा अनर्थ झालेला आहे. 'पुरा' असा शब्द वापरून कौसल्येने वास्तविक पूर्वजन्मांचाच निर्देश केला आहे. तिचा आशय

असा की, पुत्रवियोग व्हावा असे ह्या जन्मी तरी माझ्या हातून काही घडले नाही आणि तरीही पुत्रवियोग घडत आहे, त्या अर्थी पूर्वजन्मी (पुरा) माझ्या हातून असे फळ देणारा दुष्टपणा घडला असावा. कौसल्येने 'मन्ये' म्हणजे 'मला वाटते' असे स्पष्ट म्हटले आहे; पण भाषांतरात 'मन्ये'चा अनुवाद झालेलाच नाही। जर तिने खरोखरच चालू जन्मात नवप्रसूत स्त्रियांचे स्तन छाटून त्यांचे नि त्यांच्या अर्भकांचे हाल हाल केले असते तर 'मन्ये–मला वाटते' असा शब्द तिच्या तोंडी रामायणात आला नसता. वास्तविक 'पूर्वजन्मी मी मातांचे स्तन तर छाटून टाकले नसावेत ना,' असे या श्लोकाचे भाषांतर व्हायला हवे होते. कारण 'मन्ये' उत्प्रेक्षावाचक आहे.

तसेच 'नूनं' या शब्दानेही उत्प्रेक्षा व्यक्त होते. 'नूनं'चा 'खरोखर' हा अर्थ येथे लागू नाही. अनेकार्थी शब्द वापरला असता संदर्भावरून योग्य तो अर्थ घ्यायचा असतो, हे अशा प्रबुद्ध लेखकाला कोणी सांगायला हवे असे नाही; पण 'नूनं'चा अर्थ चुकल्यामुळे रामावर 'आईला मुद्दाम उगीचच सावरून घेण्याचा प्रयत्न केल्याचा' खोटा आरोप केला गेला.

ज्याचे कारण या जन्मात घडलेले नसूनही एखादे भयंकर दुःखद फल भोगावे लागते त्याचे कारण अनेक पूर्वजन्मींच्या 'संचित' कर्मात असते असे भारतीय संस्कृती यथार्थपणे मानीत आली आहे. तेव्हा अशा संस्कृतीत वाढलेले राम नि कौसल्या हे 'मन्ये' नि 'नूनं' हे दोन्ही उत्प्रेक्षाव्यंजक शब्द वापरून आणि 'पुरा' नि 'जात्यन्तरे' असे म्हणून कौसल्येच्या जन्मान्तरीच्या संचिताचाच तर्क करीत आहेत.

वास्तविक श्री. लेलेशास्त्री यांच्या मराठी भाषांतरात ही चूक कशी झाली याचे आश्चर्य वाटते; पण स्वतः 'संस्कृत-ज्ञ' असलेल्या नि 'वास्तवतेचा शोध' घेणाऱ्या लेखकाने तरी ती सुधारवून घ्यायला हवी होती. तसे होते, तर पूर्वजन्मीच्या कल्पित कृत्यावरून कौसल्येला या जन्मी 'दुष्ट' ठरविण्याचे, स्वतःच्याच मनाला खाणारे, अन्यायकारक असत्कृत्य लेखकाच्या हातून घडते ना!

'कुठले रामायण, कुठली प्रत' याला महत्त्व न देण्याचे लेखकाने मनोमन ठरविल्यामुळे काही प्रमाद घडून त्यावरून काढलेले निष्कर्षही प्रामादिक घडल्याची काही स्थळे आहेत. उदा. लेखक म्हणतात (पृ. ४५) 'गौतमांनी अहल्येला रागाच्या भरात सांगितले तू...शीला हो. दुःशीला आहेस, ती सुशीला हो!' पण 'अज्ञ लोकांनी विपरीत अर्थ करून अहल्येला शिळा म्हणजे दगड करून टाकली!'

## संशोधकाचे अ-संशोधन

येथे नम्रपणे विचारावेसे वाटते की, वाल्मीकि रामायणात या प्रसंगाच्या वर्णनात 'शीला, शीलवती' असा दीर्घ'शी'कारादी शब्द आहे का? रघुवंशात (११·३४) 'गौतमवधूः शिलामयी' असे लिहिणारा कालिदासच नव्हे तर 'अहल्या शिळा राघवे मुक्त केली' असे म्हणणारे श्रीसमर्थ रामदासही 'अज्ञ'च का? येथेच रामायणाच्या संशोधित-आवृत्तीचा, निदान संशोधकदृष्टीने 'वास्तव रामायण' लिहिणाऱ्या लेखकाने तरी, अभ्यास करण्याची आवश्यकता दिसून येते. बडोदा विद्यापीठाने प्रसिद्धिलेल्या रामायणाच्या संशोधित आवृत्तीत बालकाण्डासाठी काश्मीर ते कन्याकुमारीपर्यंतच्या सर्व लिप्यांतील एकूण ३७ पोथ्या अभ्यासिल्या होत्या. त्यांपैकी ग्रंथ नि मलयालम लिपीतील पाचच पोथ्यांत 'शिलाभूत्वा तप्यन्ती' असा पाठ आहे. उरलेल्या ३२ पोथ्यांत 'शिला भूत्वा'च्या-ऐवजी 'निराहारा' असा पाठभेद आहे. येथे शब्दाला महत्त्व आहे. दीर्घ'शी'ची ऱ्हस्व'शि' होताच शिळा म्हणजे दगड हा भलताच अर्थ झाला; पण 'सुशीला' असा शब्द मुळात नसताही तो असल्याचा तर्क चालवून व्यस्त अवास्तव निर्णय घेतला जाऊ नये, यासाठी प्रतिज्ञा मोडूनही, वाल्मीकि रामायणाचीच संशोधित आवृत्ती सत्यान्वेषणासाठी तरी लेखक एकदा वाचतील अशी अपेक्षा आहे. अशा संशोधित आवृत्ती संशोधकांनी नाही अभ्यासायच्या तर कोणी?

पण हे एक वेळ क्षम्य मानू. तथापि 'राम हा एकमेवाद्वितीय स्थितप्रज्ञ होता.' (पृ ५१) अशा स्पष्ट शब्दात रामाची सुयोग्य वाखाणणी करणारे डॉ. वर्तक पुढे 'अरण्य' ह्या सहाव्या प्रकरणात त्याच रामाला दीडशहाणा ठरवूही धजतात. टिळकांना मात्र रामाला असे म्हणायला नक्कीच भीती वाटली असती! लेखक (पृ. ७१) लिहितात–'सुवर्णमृगाला मारून पटकन परतायचे सोडून 'आणखी शहाणपणा म्हणून' रामाने आणखी एक हरण मारला. मारीचाचे कपट लक्षात आल्यावर तरी रामाने लगेच आश्रमाकडे परतायला हवे होते.' होय. 'निहत्य पृषतं चान्यं' म्हणजे 'दुसरा हरण मारून झाल्यावर राम परतला' असे रामायणात आहे; पण जो मनुष्य (राम) 'अद्वितीय स्थितप्रज्ञ' होता (असे लेखकच म्हणतात) त्याच्या हातून मूर्खपणा घडेल कसा? आणि समजा घडला असला तरी 'रामोपासक' असलेले वर्तकमहाशय 'आणखी शहाणपणा म्हणून' हे शब्द गाळून टाकते तर काय बिघडले असते? 'विनाशकाले विपरीतबुद्धी हेच खरे,' एवढा अभिप्राय पुरेसा होता. फार मोठ्या, स्थितप्रज्ञ, पूजनीय अशा थोरांच्या हातून तेही मनुष्यच असल्याने क्वचित् चूक घडलेली दिसली (म्हणजे आपल्याला तसे वाटले) तरी ती दाखविताना 'ही चिन्त्य आहे' असे म्हणण्याची सुसंस्कृत भारतीय प्राचीन परिपाटी अनुकरणीय नाही का?

## योगसिद्धींनी तरी स्पष्ट करावे

पुढे रामाला राज्याभिषेक होणार, हे कळताच अत्यानंदित झालेली कैकयी नंतर त्याला वनात हाकलण्यास प्रवृत्त कशामुळे झाली, याची लेखकाची कारणमीमांसा विचारार्ह आहे; पण वनवासाची दशरथाज्ञा कळल्यावर सीतेचा निरोप घेण्यास गेलेला राम तिला 'तू इथेच राहा. भरत हा देशाचा नि कुलाचाही राजा आहे. तेव्हा त्याचे 'विप्रिय' होऊ देऊ नकोस!' असे समजावतो. येथेही दोन प्रमुख पाठभेद आहेत. श्री. लेलेशास्त्री यांच्यापुढे 'सा त्वं वसेह कल्याणि राज्ञः समनुवर्तिनी। भरतस्य रता धर्मे सत्यव्रतपरायणा' असा पाठ होता; पण लेखक म्हणतात (पृ. ५३) तसे 'बोलण्याच्या धारेवरून यातला कुत्सितपणा लक्षात येतो' हे पटत नाही. 'भरतालाच पती समजून वाग,' असा रामाच्या म्हणण्याचा सीतेने अर्थ काढला असे एक वेळ गृहीत धरले तरी 'तू भरताची मर्जी राखून (वसेह) इथे (म्हणजे घरीच) राहा आणि सत्यव्रतपरायण अशी धर्माने वाग!' या रामाच्या समजावण्यात कुत्सितपणाचा गंध

लेखकास येतो तरी कसा ?

येथे सीता नवऱ्यावर ' भडकली ' असेल, तिने नवऱ्यावर सटकन् जिभेचा आसूड ओढला असेल; पण आत्यंतिक दुःख-शोकाच्या वेळी तोल सुटून सीता रामाच्या बोलण्याचा विपर्यास करताना दिसते म्हणून रामावर– या प्रसंगातही ज्याची स्थितप्रज्ञता ( म्हणजे सुख-दुःखात मनाचा तोल न ढळणे– ) टिकून राहिली त्याच्यावर लेखकाने कुत्सितपणाचा केलेला आरोप कोणाला समर्थनीय वाटेल ?

बरे, सुदैवाने लेखक हे लिंगदेहाने इतर ग्रहांवर भ्रमण करून येण्याइतकी दिव्य यौगिक सिद्धी लाभलेले आहेत. त्यांच्याकडून भरद्वाजांच्या योग-सिद्धीचे स्पष्टीकरण नि समर्थन अपेक्षित होते; पण त्यांनी ते टाळले आहे. भरत जेव्हा भरद्वाजाश्रमात रामाला परत आणण्यासाठी गेला, तेव्हा त्याने दूर ठेवलेल्या सर्व सेनेला आश्रमापाशी आणण्यास सांगून भरद्वाजांनी त्या सर्वांचे आदरातिथ्य करताना 'आपल्या सिद्धींची माया वापरली. ' त्या वर्णनावर भौतिक विचार करून निष्कर्ष काढणे चुकीचे ठरेल ' ( पृ. ५९ ) एवढेच लेखकांनी म्हटले आहे; पण एवढ्याने योगाच्या सामर्थ्याचा अनुभवच नव्हे तर माहितीही नसणाऱ्या नि केवळ भौतिक शास्त्रेच प्रमाण मानून चालणाऱ्यांची वाल्मीकीच्या ह्या वर्णनावर श्रद्धा बसावी कशी ? अगदी अलीकडच्या काळात आळंदीस श्रीनृसिंहसरस्वतींच्या मुलाची मुंज होती. ( कै. ) महर्षि अण्णासाहेब पटवर्धन स्वतः तेथे गेले होते. त्यांनी फार तर बारा शेर दूध मावेल एवढ्या हंड्यात ठेवलेले दूध दहा हजार पानांना वाढले गेल्याचे पाहून–आश्चर्याने महाराजास विचारले. ते त्यावर इतकेच उत्तरले की, ' ती सामुग्री इथली नव्हती. ' (अप्रबुद्धकृत महर्षी पटवर्धन-चरित्र, पृ. ५१) अशा सिद्धींचे योगसूत्राधारे थोडेसे तरी स्पष्टीकरण योगसिद्ध वर्तकांनी नाही करायचे तर कोणी करायचे ?

## आता एवढे करावे

तथाकथित संशोधकांची वस्तुतः अतिप्राचीन ग्रंथ वा घटनांना, दुराग्रहाने वा मिथ्या प्रमाणांवरून शक्य तेवढे अर्वाचीन ठरविण्याची खोड सत्याचा विपर्यास करणारी असल्याने सत्याची चाड असलेल्या वर्तकांसारख्या लेखक-संशोधकाला त्याची चीड येणे स्वाभाविक आहे; पण तेवढ्याने काही अशा संशोधनावर जर टीका वारंवार, मुद्दाम प्रसंग उकरून काढून, केली गेली तर ती पोरकट वा टीकास्पद नाही का ठरणार ? असे पाच-सात प्रसंग वास्तव रामायणात आहेत. त्यातला एक असा–' चौदा वर्षे मी तुमची वाट पहात कंदमूल भक्षून नगराबाहेर राहीन, ' असे भरत रामाला म्हणतो. यावर ' उपोषण व बैठा सत्याग्रह भरताने केला याचा अर्थ बॅ. मो. क. ऊर्फ महात्मा गांधी यांच्यानंतर म्हणजे १९२० इ. स. नंतर भरत झाला असे कोणी समजू नये,'(पृ. ६१) ह्या असल्या टीकेने काय साधले ते लेखकांनाच ठाऊक !

शेवटी वंशावळी–रघुकुलाची वंशावळी–देऊन भारताचा इतिहास किती प्राचीन आहे हे एका दृष्टिक्षेपात कळण्याची सोय केली आहे आणि परिशिष्टांनी रामायणकाळी भारतात वैज्ञानिक प्रगती किती झाली होती, हेही दाखविले आहे.

आपल्या ' मनोगतात ' ( पान ११ वे ) ' एकट्या वाल्मीकीनेच संपूर्ण रामायण लिहिले असे अभ्यासान्ती माझे मत झाले आहे. हस्तलिखिते काढताना काही फरक झाले असतील तर तेवढेच; काही दुरुस्त्या केल्या असतील तेवढ्याच. संपूर्ण कांड नवीन टाकले किंवा सर्ग नवीन घातला असे घडलेले नाही ' असे आपले मत संशोधित आवृत्तीचा अभ्यास न करताच लेखकमहाशयांनी मांडले आहे. म्हणूनच वस्तुस्थिति तशी नाही एवढे त्यांच्या निदर्शनास आणून देणे भाग आहे.

' वास्तव रामायण ' या ग्रंथाद्वारे राम नि रामायण यांचा काल नि रामायणांतील स्थलांची स्थाने यांवर मात्र चांगलाच नवा प्रकाश टाकला आहे. ते ग्रंथातला एवढाच भाग वेगळा इंग्रजीत छापून काढतील तर रामायणावरील जागतिक वाङ्मयात मोलाची भर घातल्याचे श्रेय लाभून भारताची कीर्तीही दिगंती फाकेल.

–ह. त्र्यं. देसाई

**वास्तव रामायण**

लेखक : डॉ. प. वि. वर्तक
प्रकाशक : सौ. शोभना प. वर्तक
वर्तकाश्रम, ४९७ शनिवार, पुणे ३०
पृष्ठे २९२, मूल्य रु. २०.

---

## ढासळलेली मने : पृष्ठ ८ वरून

मान्य नसली तर त्याविरुद्ध मतप्रदर्शन करायलाही तेथे बंदी झाली. व्यक्तिवाद आणि समूहवाद या दोहोतलाही एकांगीपणा, अतिरेकीपणा आणि त्यातून निर्माण होणारे दोष टाळावयाचे असतील तर लोकशाही समाजवादाचाच मार्ग अवलंबावयास हवा.

तेवढेही पुरेसं नाही. समाजवादाचं उद्दिष्ट गाठीत असतानाच नवा मानव घडविण्यासाठी सर्व पातळीवर जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत. समाजपद्धती बदलली की, माणसामध्ये गुणात्मक बदलही होईल असे कम्युनिस्ट मानीत होते व मानतात; पण नवा मानव घडविण्यात साठ वर्षांच्या प्रयोगानंतरही रशियाला यश आलेलं नाही. भांडवलदारी राष्ट्रांच्या मनात कम्युनिस्ट देशात गुन्ह्यांचं प्रमाण कमी आहे हे खरं; पण विरोधी आवाज दडपून टाकण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी तेथे केलेले गुन्हे अधिक गंभीर स्वरूपाचे आहेत. चांगल्या मूल्यांवर श्रद्धा असलेला नवा मानव घडविण्यासाठी सतत प्रयत्न करीत राहणं हाच गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्याचा परिणामकारक मार्ग आहे. हा लांबचा मार्ग असेल; पण तोच खात्रीचा आहे.

जोशी–अभ्यंकर हत्याकांड खटल्याच्या निकालानंतर मनात सहजपणे आलेले हे काही विचार. विचारवंतांमध्ये या प्रश्नावर अधिक सखोल चिंतन व विचारांची देवघेव व्हावयास हवी; पण नुसतं विचाराच्या पातळीवरच न थांबता त्या दिशेनं काही कार्यक्रमाचीही आखणी व्हावी असं वाटतं.

☐

‘ तरुण भारत ’ वार्ता :

# दोन ज्येष्ठ संपादकांची प्रसन्न निवृत्ती

सव्वीस सप्टेंबरला बालगंधर्व रंगमंदिराच्या दाराशी उभं राहून आत शिरणाऱ्या ओळखी आणि अनोळखीच्या माणसांचा ओघ पाहून मला एक गंमतीदार तटस्थता आली.

‘ कुणाचा सत्कार आहे ? ’

‘ पुण्यातल्या दोन ज्येष्ठ पत्रकारांचा ! ’

‘ कोण हे ? ’

‘ बापूसाहेब भिशीकर आणि वसन्तराव गीत. ’

एकाची मी मुलगी. दुसरे गेली वीस वर्षे ओळखीचे. तरीही प्रारंभी असं वाटलं की, यांना आपण खरंच ओळखतो का ? फार जवळून कॅमेऱ्याचा फोकस अॅडजस्ट होत नाही म्हणून आज आपण जरा दुरूनच पाहतो आहोत का ?

सनई वाजते आहे. निमंत्रक प्रसन्न मुद्रेनं अभ्यागतांचं स्वागत करताहेत. सुगंधाची शीतल शिपणूक होते आहे. नमस्कार–प्रतिनमस्कार झडताहेत. वसंतराव शान्तपणे श्रोत्यांमध्येच येऊन बसलेत. बापूसाहेब यायचेत. माझ्या मनात आलं की, गेल्या काही दिवसात गेल्या वीस वर्षांतलं काय–काय या दोघांना आठवत असेल ?

अठ्ठावन साली दैनिक ‘ तरुण भारत ’ची जबाबदारी यांनी आपल्या उमेदीत खांद्यावर घेतली. आज अठ्ठ्याहत्तर साली सहजपणे, विश्वासाने ती नव्या खांद्यांवर सोपवली. खरं तर एखाद्या व्यवसायात आपण समारंभानं पाऊल घालत नाही, त्यामुळे निरोपाचा सुद्धा समारंभ नसावा, अशीच या दोघांची इच्छा; पण स्नेह–सदिच्छा–लोभ यांचा अधिकार दोघांनाही मानावा लागला.

मुख्यमंत्र्यांनी मोठ्या मार्मिकपणे ध्यानी आणून दिलं की, स्वागत समारंभ पुष्कळच होतात; कारण अधिकारावर येणाऱ्या व्यक्तीकडून अपेक्षा असतात. पण निरोप समारंभाला इतकी उपस्थिती, इतका जिव्हाळा असणं दुर्मिळच. ‘ तरुण भारत ’ वर आणि ‘ तरुण भारत ’च्या या दोन पत्रकारांवर लोभ असलेल्यांचं ते जणू सुहृदसंमेलनच होतं.

आणखी एका गोष्टीचा मुख्यमंत्र्यांनी आवर्जून उल्लेख केला. दोन सारख्या तोलामोलाची माणसं परस्पराशी जुळवून घेऊन एक दिलानं एका संस्थेत वीस वर्षं काम करतात, ही लहान गोष्ट नाही. खरोखर, ज्या आदराने या दोघांनी आपापल्या मनोगतात एकमेकांच्या श्रेयांचा मनमोकळा उल्लेख केला त्यात या परस्परपूरकतेचं दर्शन होत होतं.

डॉ. वि. रा. करंदीकरांच्या स्वागतपर बोलण्यानंतर डॉ. सरोजिनीताई बाबर यांनी अगदी घरगुती सुरुवात केली. माडखोलकरांनी भिशीकर पुण्याला ‘ येऊन राहिलेत ’ ही वार्ता कशी दिली, हा नागपुरी किस्सा ऐकताना श्रोत्यांमध्ये खूपच खसखस पिकली.

प्रल्हादजी अभ्यंकरांनीही मराठवाड्याचे किस्से ऐकविले; पण प्रसिद्धी कशाला द्यायची आणि कशाला द्यायची नाही याविषयी तारतम्य ठेवा, अशी विनंतीही पत्रकारांना केली.

समारंभाचे अध्यक्ष दैनिक ‘ सकाळ ’ चे संपादक मुणगेकर यांच्या भारदस्त भाषणात त्यांनी वृत्तपत्रांच्या ‘ सावध निरीक्षकांच्या ’ भूमिकेची मोलाची चर्चा केली. तसंच गीत–भिशीकर यांनी ती भूमिका चांगली पार पाडल्याबद्दल त्यांचं अभिनंदन केलं.

वसंतरावांनी सत्काराला उत्तर दिलं तेव्हा अनेक आठवणी त्यांच्या मनात दाटत होत्या. कै. विनायकराव आपटे आणि त्या वेळची अनेक मोठी मंडळी यांनी जो विश्वास दाखविला त्याला आपण पात्र ठरलो; याविषयीचं समाधान त्यांच्या सद्गदित शब्दांतून व्यक्त होत होतं.

बापूसाहेबांनी नेहमीच्या शान्त, संथ शैलीत सुरुवात केली. त्यांनी वृत्तपत्र-नीतीची दोन फार महत्त्वाची तत्त्वं सांगितली. आम्ही समाजात दुफळी माजविणाऱ्या शक्ती निर्माण करणार नाही, तर समाजाला समान भूमिकांवर एकत्रित आणणाऱ्या शक्ती निर्माण करू, हे त्यातील पहिलं; दुसरं म्हणजे सामाजिक वातावरणाचं प्रदूषण करणं वृत्तपत्रांचं काम नसून त्याचं शुद्धीकरण करणं हे वृत्तपत्रांचं काम आहे असं ते म्हणाले.

मुख्यमंत्र्यांच्या भाषणातही अशाच प्रकारचे विचार सोदाहरण व्यक्त झाले. दोन विद्यापीठांचे संदर्भ देऊन त्यांनी विचारलं की, समतोल मांडणीची अपेक्षा आम्ही वृत्तपत्रांकडून करू नये का ?

या सत्काराच्या निमित्तानं वृत्तपत्रे – समाज – शासन यांच्या परस्परसंबंधाविषयी विशेष चिंतन श्री. मुणगेकर, बापूसाहेब भिशीकर आणि मुख्यमंत्री श्री. शरदराव पवार या तिघांच्याही भाषणात व्यक्त झालं, हा या कार्यक्रमाचा विशेष म्हटला पाहिजे.

ज्या दोन पत्रकारांचा या कार्यक्रमात गौरव झाला ते दोघे आपापल्या शक्ती घेऊन कसे, कुठून एकत्र आले त्याची गोष्ट ऐकण्यासारखी आहे.

पुण्यात ‘ तरुण भारत ’ सुरू होण्यापूर्वी ‘ भारत ’ हे दैनिक चालत असे. श्री. भा. गो. बापट हे दैनिकाचं संपादन करीत. कै. विनायकराव आपटेप्रभृती राष्ट्रवादी मंडळींनी जेव्हा ‘ संपादन तुम्ही करा, ’ असं बापटांना सांगितलं तेव्हा ते म्हणाले, ‘ गीतांना मदतीला देत असाल तर करतो. ’ गीतांनी मदत करण्याचं लगेच मान्य केलं. या कामाचा व्यवसाय म्हणून त्यांनी अंगीकार केला नाही तर जीवनव्रत म्हणून केला. ‘ भारत ’चा ‘ तरुण भारत ’ झाल्यावरही त्याच तळमळीनं, जिद्दीनं वसन्तरावांनी त्यात स्वतःला गुंतवून टाकलं. रात्र पाहिली नाही की दिवस पाहिला नाही. जी विचारधारा त्यांनी निष्ठने स्वीकारली होती ती अधिकाधिक लोकांपर्यंत पोचावी यासाठी ते सतत श्रमत राहिले. बातमी रात्री दोनला येवो की तीनला येवो – त्यांनी कंटाळा मानला नाही.

गेल्या काही दिवसांतलीच गोष्ट आहे. एका संस्थेचा वर्धापनदिन होता. त्यानिमित्त त्या संस्थेच्या चालकांविषयी एक लेख मुद्दाम मागविलेला होता. तो ठरलेल्या दिवशी येणं जरूर होतं. आदल्या दिवशी दुसऱ्या दिवशीच्या अंकाची प्रत वसन्तरावांनी रात्री दहा वाजता पाहिली. त्या अंकात लेख नाही हे पाहून ते अस्वस्थ झाले

त्यांनी प्रेसला फोन केला.

'......लेख का नाही ?'

'......कारणानं राहिला', दिलगिरीचं उत्तर आलं. वसन्तराव ठामपणे म्हणाले – 'तो लेख यायलाच पाहिजे! 'तरुण भारत'नं लेखाबाबत शब्द दिला आहे. मी आत्ता प्रेसला येतो. अंक करून टाकू!'

ते तडक प्रेसला गेले. मजकुराची पुन्हा जुळवाजुळव झाली आणि पहाटे तीन वाजता निघालेल्या अंकात लेख पाहूनच वसंतराव घरी परतले. लोकानुरंजनाचं काम म्हणजे थट्टा नव्हे! डोळ्यात तेल घालून ते वसंतरावांनी केलं आहे.

'तरुण भारत'चा व्याप सांभाळून विद्यापीठाच्या सिनेटवर त्यांनी काम केलं आहे. जिथे अन्याय होतो आहे असं वाटलं, तिथे ते ताकदीनं उभे राहिले आहेत– निःस्वार्थीपणाने झगडले आहेत. टेलिफोनच्या अॅडवायझरी बोर्डावर काम आपण करतो, मग चार मित्रांची टेलिफोनची सोय करू असा विचारही त्यांच्या मनाला शिवला नाही. टेलिफोन सिस्टीमचा त्यांनी चिकित्सेनं अभ्यास केला आहे. त्यात मोलाच्या सुधारणा सुचविल्या आहेत. त्यामुळे बोर्डातही खूप आदर आणि प्रेम त्यांना लाभले आहे. तत्त्वनिष्ठेमुळे काही माणसे रुक्ष-कठोर होतात; पण वसंतरावांच्या मनातले माणुसकीचे स्वच्छ झरे नेहमीच मोकळेपणाने वाहत आले आहेत.

मला आठवतं की, आमच्या घरात कुणालाही बरं नसलं की वसतराव–इंदुताई येणार, आस्थेनं चौकशी करणार. गप्पा–चहापाणी असं नेहमीच. माझ्या आईची आणि इंदुताईंची चांगली मैत्री. नागपूरहून पुण्याला आल्यावर वसतरावांच्या घराचा कौटुंबिक जिव्हाळा अनुभवाला आला; पण इंदुताई अचानक वसतरावांची साथ-सोबत सोडून गेल्या! त्या गेल्यानंतर वसंतराव जरा अबोल झाले. संसारात–ध्येयविचारात ज्यांनी सतत संगत केली त्या इंदुताई सत्काराच्या हृद्य कार्यक्रमाच्या वेळी नव्हत्या. वसंतरावांना, त्यांच्या कुटुंबियांना त्यांचं नसणं किती जाणवलं असल या विचारानं मन अवघडून गेलं.

आम्ही मंडळी अठ्ठावनमध्ये नागपूरहून पुण्याला आलो. बापूसाहेबांनी श्री. ग. वि. केतकरांचे सहकारी म्हणून, कार्यकारी संपादक म्हणून काम पाहायला सुरुवात केली. काही पहिल्या ओळखी वसंतरावांनीच करून दिलेल्या. आम्ही पुण्याला हळूहळू रुळलो. पुण्याचेच झालो.

आता पुण्यातले स्नेह, नाती ऋणानुबंध इतके विस्तारले आहेत! बापूसाहेबांमुळे ते निर्माण व्हावेत, आईच्या हाताच्या रुचीने, वागण्यातल्या प्रसन्नतेमुळे ते सांभाळले जावेत असं चित्र आम्ही पहात आलो आहोत.

पुण्यातच नव्हे तर महाराष्ट्रात ठिकठिकाणी व्यक्तिगत जिव्हाळ्याची, समविचारांची किती तरी माणसे आहेत! बापूसाहेबांवर प्रेम करणारा, त्यांच्या लिखाणाची उत्सुकतेनं वाट पाहणारा, त्या लिखाणावर विचार करणारा, त्यातून प्रेरणा शोधणारा असा एक मोठा वाचकवर्ग महाराष्ट्राच्या शहरातून, खेड्यातूनही आहे.

हे आजचं चित्र झालं; पण वीस वर्षांपूर्वी 'तरुण भारत'मध्ये पाऊल ठेवताना बापूसाहेबांच्या मनात कोणत्या भावना असतील? राष्ट्रीय स्वयंसेवक संघासारख्या संघटनेतून ज्या प्रखर राष्ट्रवादाची मुळे मनात खोलवर गेली त्याचा उत्कट आविष्कार अठ्ठेचाळीस साली भूमिगत असताना पत्रकातून झाला होता. अंधाऱ्या खोलीत लपून-छपून ज्वालाग्राही लिखाण करण्याचा तो स्वातंत्र्यमंत्रित काळ होता. शब्दांना ध्यासांची ज्वालाबने पेटविण्याचे सामर्थ्य आलं होतं. त्यापूर्वीही कराचीसारख्या ठिकाणी राष्ट्रवादाची ज्योत घेऊन जाताना शंका मनाला शिवली नव्हती. साहस आणि समर्पण हे त्या वेळचे परवलीचे शब्द होते.

पण कार्यकारी संपादकाची भूमिका वेगळी होती. लेखणीला वेगळे वळण हवे होते. लोकांना पेटविणे हा हेतु नव्हता. आता उद्दिष्ट लोकशिक्षणाचे होते. आपल्या स्वभावगत गांभीर्याने ते बापूसाहेबांनी स्वीकारले असणार. संयम आणि समतोल हे त्यांच्या लेखणीचे वैशिष्ट्यच होऊन गेले आहे.

सॉमरसेट मॉमबद्दल सांगतात की, अमुक वेळी लिखाणाला बसायचंच, असं त्याचं ठरलेलं असे – मग सुचो की न सुचो. वृत्तपत्राच्या संपादकालाही असंच करावं लागतं आणि त्याला न सुचूनही चालत नाही– संपादकाची लेखनशक्ती लहरी असून चालत नाही. म्हणून घरात काहीही कार्यक्रम असो, गडबड असो, बापूसाहेब आपल्या ठराविक ठिकाणी तक्क्याला टेकून लिहायला बसलेले नाहीत असा दिवस दुर्मिळ! (आम्हाला काही लिहायचं असल्यास आम्ही या जिथे हुकमी सुचतं अशा, विक्रमादित्याच्या सिंहासनाचा आश्रय करतो!)

रोजचं वाचन – व्यासंग (त्यापुढे कसलीच मातब्बरी न वाटणं) यातून रोज समृद्धी येत असली पाहिजे.

वृत्तपत्राची धोरणे, चालकांच्या अपेक्षा, वाचकांच्या अपेक्षा, समाजातल्या वेगवेगळ्या गटांच्या वेगवेगळ्या अपेक्षा, कोर्ट आणि खटले या सर्वांतून मन शान्त ठेवून स्थिरबुद्धीने लेखन करणे ही खरोखर तपश्चर्या आहे. गेली वीस वर्षं ती बापूसाहेबांनी केली आहे.

पण खरी कसोटी लागली ती आणीबाणीत. 'तरुण भारत'च्या अग्रलेखाच्या कोऱ्या कॉलमने संपादकाचं क्षुब्ध मौनच व्यक्त केलं होतं. बापूसाहेब सांगतात की, एकदाच हा व्यवसाय सोडावा असं मनात आलं – ते आणीबाणीच्या वेळी 'तरुण भारत'च्या धोरणाच्या चर्चेची बैठक झाली तेव्हा! सगळी लेखनशक्ती धोरणांच्या गळफासानं मृतप्राय होते की काय, असं वाटलं.

पण ते सावट झटकून बापूसाहेब विचार करायला लागले. 'तरुण भारत'ला फास लागणार नाही, पण लोकांना जागवीत ठेवील असे लिखाण करणे हे आणीबाणीचे आव्हान होते.

या काळात बापूसाहेबांच्या लेखणीने आणि वृत्तीनेही एक कुशल वळण घेतले. विश्वामित्राच्या तामस व्यक्तिमत्त्वावरील लेख हे त्याचे चांगले उदाहरण आहे.

प्रतिरविवारचे स्फुटलेखन हा ललित चिंतनप्रकार वाचकांना फार प्रिय झाला. गेल्या चार वर्षांत या लेखनाबरोबर किंवा या लेखनाचे कारण असलेला बापूसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वातला बदल घरच्या मंडळींना, मित्रमंडळींनाही जाणवल्यावाचून राहिला नाही.

त्यांचं पूर्वीचं अबोल गांभीर्य जाऊन गेल्या चार वर्षांत त्यांच्यात अधिक प्रसन्नपणा आला आहे. वाचनाचा कल राजकारणापेक्षा संतवाङ्मयाकडे वळला आहे.

अध्यात्माविषयी कुणाची काहीही मते असोत; पण बापूसाहेबांना त्यातून काही तरी विशेष मनःशक्ती मिळाली आहे यात संदेह नाही. एकात्म मानवतावादाच्या नव्या दिशा त्यांना दिसताहेत. ते अंतर्मुख होऊन विचार करताहेत. कदाचित यामुळेच 'तरुण भारत'च्या संपादकपदाच्या जबाबदारीतून मोकळं झाल्याचं त्यांना बरं वाटत असलं पाहिजे. यानंतर वाचायला, मुक्त चिंतनाला पुष्कळ उसंत आहे. काम आहे; पण मनाजोगे, करायला आनंद वाटेल असेच आहे.

बापूसाहेब आणि वसन्तराव या भिन्न, पण आपापल्या परीने मोलाच्या अशा जीवनपद्धती आहेत.

प्रौढत्वाचे म्हणून काही सौंदर्य असते. ते परिपक्व विचारांचे, समृद्ध अनुभवाचे आणि अनुभवाने आलेल्या सहिष्णुतेचे सौन्दर्य असते. टागोरांनी म्हटल्याप्रमाणे

Where the mind is led
Forward by thee,
Into ever widening thought
and action.

अशा त्या विशाल मनोभूमिकेकडे प्रौढत्वाचा प्रवास असतो. या प्रवासासाठी बापूसाहेबांचं आणि वसंतरावांचं विनम्र शुभचिंतन ! !

—स्वर्णलता भिशीकर

---

## मुंबई वार्ता : पृष्ठ ३ वरून

करीत आहे, अशी मोठी आशादायक घोषणा उद्योगमंत्र्यानी केली. ही घोषणा कृतीत उतरली तर ही परिषद खऱ्या अर्थानं यशस्वी ठरली असं म्हणता येईल. □

## □ पायाभूत अभ्यासक्रम

अभ्यासक्रमातील एफ्. वाय्. आणि नवीन एस्. वाय्. ( प्राकृतात सांगायचं तर तेरावी आणि चौदावी ) या दोन वर्गांसाठी पायाभूत अभ्यासक्रम ( Foundation Course ) या वर्षापासून सुरू केला आहे. शालांत परीक्षेनंतर स्वतंत्र विद्याशाखा निवडून वाणिज्य, विज्ञान अशा स्वतंत्र विद्याशाखेचा अभ्यास सुरू व्हावा हे मुंबई विद्यापीठाला मान्य नाही. विद्याशाखेची निवड झाल्यानंतरही न निवडलेल्या विषयांशी संपर्क रहावा व विद्यार्थ्यांचे ज्ञान एकांगी बनू नये यासाठी हा अभ्यासक्रम आहे असे सांगण्यात येते. त्यामुळे भारताचा आर्थिक व सामाजिक इतिहास आणि जगाचा सांस्कृतिक इतिहास हे विषय विज्ञान, वाणिज्य या शाखांना, तर विज्ञानाचे तत्त्वज्ञान हा विषय कलाशाखेच्या विद्यार्थ्यांना शिकणे भाग आहे.

मुळात अमुक एका टप्प्यानंतर ( Specialization ) झाल्यानंतर पुन्हा अशा स्वतंत्र विषयांची गरज आहे का ? जिथे धडपणे नवा अभ्यासक्रम देखील राबविता येत नाही, तिथे ही नवी भर कशासाठी ? नव्या अभ्यासक्रमातले विद्यार्थी शैक्षणिक साधने आणि प्रशिक्षित शिक्षक यांच्या अभावी आधीच एका प्रयोगाचे बळी ठरले आहेत. अशा स्थितीत बोजा वाढविण्याचा अट्टाहास का ? याउपर जुन्या जाणत्या शिक्षणतज्ज्ञांना हा पायाभूत अभ्यासक्रम हवाच असे वाटत असेल तर त्यासाठी पूर्वतयारी का झाली नाही ? गेल्या वर्षापासून हा अभ्यासक्रम अंमलात यायचा होता; पण विद्यापीठातील गोंधळामुळे तो या वर्षी अंमलात आला. त्यामुळे या वर्षीच्या एस्. वाय्.च्या विद्यार्थ्यांना एकाऐवजी दोन विषयांची परीक्षा द्यावी लागेल. म्हणजे गोंधळ विद्यापीठाचा आणि शिक्षा विद्यार्थ्यांना !

या अभ्यासक्रमाला बहुसंख्य प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा विरोध आहे, तो त्यातील नियोजन व दूरदृष्टीच्या अभावामुळेच. या अभ्यासक्रमासाठी दर्जेदार पुस्तके उपलब्ध नाहीत. अनेक महाविद्यालयांतून या अभ्यासक्रमाबद्दल विद्यापीठाचं धोरण अस्पष्ट होतं तोपर्यंत तो शिकविला जात नव्हता. शिवाय या अभ्यासक्रमासाठी जास्तीचे प्राध्यापक तरी कॉलेजातून कुठे आहेत ? अनेक ठिकाणी बेकार होऊ पहाणाऱ्या, संस्कृतसारख्या विषयाच्या प्राध्यापकांना हा अभ्यासक्रम शिकविण्यास सांगून कॉलेजची चक्क प्राथमिक शाळा केली आहे.

या प्रश्नावर विद्यार्थी परिषद, विद्यार्थी सेना व काही साम्यवादी संघटनांनी आवाज उठविला आहे. एका घोषणेनुसार विद्यापीठाने या अभ्यासक्रमात मिळालेले गुण एकूण गुणसंख्येत धरले जाणार नाहीत, अभ्यासक्रमाचा काही भाग या वर्षापुरता स्थगित ठेवला जाईल, अभ्यासाचे तास कमी केले जातील इ. धोरणं स्पष्ट केली आहेत; परंतु निदान या वर्षापुरता हा अभ्यासक्रम स्थगित करून संपूर्ण पूर्वतयारीसह तो पुढच्या वर्षी राबवावा, असं बहुसंख्य विद्यार्थ्यांचे मत आहे.

त्यामुळेच विद्यापीठाने काही सुधारणा केल्यानंतरही विद्यार्थ्यांचे समाधान झालेलं नाही. गेल्या आठवड्यात विद्यार्थी-सेना आणि विद्यार्थी कृतिसमितीच्या वतीने एक मोर्चा नेण्यात आला होता. त्या वेळी दगडफेकीचे प्रकार घडल्याने पोलिसांनी हस्तक्षेप केला. अनेक वृत्तपत्रांनी म्हटल्याप्रमाणे विद्यार्थ्यांची ही हुल्लडबाजी निश्चितच निषेधार्ह आहे.

पण मुंबईतील पत्रकारांनी मुंबई विद्यापीठाच्या गोंधळावरही प्रकाश टाकायला हवा. महत्त्वाच्या परीक्षांचे निकाल अद्याप लागलेले नाहीत, ही बातमी आता जुनी झाली; पण या विलंबामुळे समस्या आणखीनच वाढल्या आहेत. एल्एल्बी. आणि एम. ए. या वर्गांचं पहिलं सत्र सुरू व्हायला आता डिसेंबर उजाडेल. मग पहिल्या सत्राचं शिक्षणशुल्क घेण्याचा विद्यापीठाला काय अधिकार ? ऑक्टोबर-परीक्षा याही वर्षी होण्याची चिन्हे नाहीत, याला जबाबदार कोण ? विद्यार्थीसिवाच्या निवडणुका गेल्या वर्षी फक्त दहा दिवसांच्या कार्यकालासाठी झाल्या होत्या आणि सिनेटवर पदवीधरांचा प्रतिनिधी घेण्याची निवडणूक १९७५ नंतर अद्याप झालेली नाही. कर्मचारी आणि विद्यापीठ यांच्यातील पगारवाढीबद्दलचं भिजत घोंगडं गेल्या पाच वर्षांपासून अद्याप वाळलेलं नाही, हे यापैकी बऱ्याच गोष्टींचं मुख्य कारण आहे. या सगळ्या गोंधळात काही हजार विद्यार्थ्यांची ओलीस ठेवल्यासारखी कुचंबणा होत आहे आणि त्याची कोणालाच चिंता नाही.

शिवाय, जनता सरकार आल्यानंतरही राज्याच्या शिक्षणखात्याने या बाबतीत जो थंडपणा दाखविला आहे तो आश्चर्यकारक व मुख्य म्हणजे निराशा करणारा आहे.

प्रतिस्पर्धी पक्षाचं तिकिट मान हालवून नाकारणाऱ्या गाढवाची गोष्ट निवडणुकीतल्या प्रचारात हमखास सांगितली जाते. राजकारणातलं हे गाढव शिक्षणक्षेत्रात आलं तर मुंबई विद्यापीठाचा विद्यार्थी व्हायला ते आणखीनच कसून नकार देईल. □

## अवती-भवती : पृष्ठ ४ वरून

नांवेही या संदर्भात घेण्यात आली आहेत. अर्थात असं असलं तरी एक राजकीय तत्त्वप्रणाली म्हणून नक्षलवादाची पुनर्रचना आणि एक लढाऊ संघटना या दृष्टीनं नक्षलवाद्यांची जमवाजमव या दोन्ही प्रक्रिया पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, बिहार ओरिसा, आसाम, मध्य प्रदेश आणि पंजाब या मोठ्या भूप्रदेशात चालू झालेल्या आहेत, याची दखल घ्यायलाच हवी. नक्षलवादी चळवळीचे सुरुवातीचे जे उद्रेक १९६७–१९७२ या काळात झाले, ते दडपून टाकणं त्या वेळी जितकं सोपं गेलं, तितके त्याचे भविष्यकालीन संभाव्य उठाव दडपणे सोपे जाणार नाही असं वाटतं. कारण एक तर नक्षलवाद्यांचे चळवळीचे मार्ग कायद्याच्या चौकटीत संपूर्णपणे बसतातच असं नसलं तरी सामाजिक परिवर्तन व आर्थिक शोषणमुक्तीच्या समस्या त्यांनी जितक्या प्रभावीपणानं मांडल्या आहेत, तितक्या त्या आजवर क्वचितच मांडल्या गेल्या असतील. तेव्हा त्या कार्यकर्त्यांना दडपणं सोपं आहे; पण समस्यांचा उद्रेक कसा दाबून टाकणार आणि किती काळ ? दुसरे असे की, मागच्या अनुभवावरून नक्षलवादी आता आपल्या चुका सुधारतील, असे दिसते. उदाहरणार्थ, वैयक्तिक दहशतवादाऐवजी आता त्यांचा भर सामुदायिक चळवळीवर राहील, ती मोडून काढणे कठीण जावे. तिसरे महत्त्वाचे कारण म्हणजे अंतर्विरोधाने पोखरलेले आजचे दुबळे केंद्रशासन आणि त्याच्याच छोट्या आवृत्त्या असलेली डळमळती राज्यसरकारे यांना असे उठाव दडपणे, १९७१–७२ च्या इंदिरा लाटेतील 'स्थिर' सरकारांइतके सहजसाध्य ठरणार नाही !

अर्थात नक्षलवाद्यांचा (सध्या) विशेष उग्र नसणारा प्रश्न वगळला तरी कायदा आणि सुव्यवस्थाविषयक प्रश्नाची तीव्रता कमी होत नाही. जनता पक्ष सत्तेवर आल्यापासून सुरुवातीच्या काही महिन्यातच घडलेले रेल्वे–अपघात (की घातपात ?) ही या प्रश्नाचीच एक बाजू आहे — शासन ते मान्य करीत नसले, तरीही आणि जातीय संघर्षाच्या ठिणग्या उडायला लागल्यापासून तर 'लॉ अँन्ड ऑर्डर प्रॉब्लम'चे स्वरूप अधिकच उग्र, गंभीर बनले. कंझावला इथली कुप्रसिद्ध दंगल त्या दृष्टीने लक्षात ठेवण्याजोगी आहे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी सरकारने आपल्या परीने प्रयत्न केले नाहीत असे नव्हे — म्हणजे काय तर पोलिस महानिरीक्षकांच्या राष्ट्रीय बैठकीत पंतप्रधानांनी पोलीस दलाचा संपूर्ण दृष्टिकोन आणि कार्यपद्धतीच बदलण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आणि केंद्रीय सरकारने 'पोलीस आयोगा'ची स्थापना केली. तसेच मागासवर्गीयांना दिलेल्या सवलती प्रामाणिकपणे राबविण्याची व त्यांना संरक्षण देण्याची आवश्यकता केंद्राने राज्यांना ठामपणे कळविली आणि 'अल्पसंख्यांक आयोगा'ची नियुक्ती केली; पण यातली कोणतीच तरतूद बिहार किंवा मराठवाड्यातल्या दंगली टाळू शकली नसती हे उघड सत्य नाही काय ? अशा उपाययोजनांनंतरही दलितांवरील अत्याचार आणि नागरी हक्क संरक्षण कायद्याखालचे खटले यांचे प्रमाण वाढतच आहे. आघाडी मारली आहे ती उत्तर प्रदेशने. १७४ ठार आणि ५७५५ खटले दाखल : एप्रिल १९७७ ते मार्च १९७८ या काळात ! मध्य प्रदेशचा क्रमांक अर्थातच पुढचा : ६३ इसम ठार झाले आणि ३७९८ खटले भर गेले. राजस्थान : क्रमांक तीन : २७ मृत्यू आणि ४३५ खटले. क्रमांक चार : कर्नाटक – १० बळी आणि ८९ खटले — दक्षिणेतले अग्रगण्य राज्य आणि फक्त पाच ठार, सत्याऐंशी गुन्हे या आकडेवारीसह आंध्र प्रदेशचे स्थान पाचवे ! आता यावर शासनाने वेळोवेळी दिलेली ही स्पष्टीकरणे पहा—

एक : या स्वरूपाच्या गुन्ह्यात काही कट / साखळी वगैरे नाही, त्यामुळे देशातल्या कायदा आणि सुव्यवस्थेला कोणताही सार्वत्रिक धोका निर्माण झालेला नाही.

दोन : काही गुन्हे घडले असले तरीही परिस्थिती पूर्णपणे आटोक्यात आहे / आटोक्यात येत आहे.

तीन : यातील सर्वच अल्पप्रकार जातीय आहेत असं नाही. अनेक गुन्हे आर्थिक संघर्षातून अथवा कामगारांच्या असंतोषातून उद्‌भवतात ! (जणू कारणे बदलल्यामुळे सुव्यवस्थेला असणारा मूळचा धोका कमीच होणार असतो !)

चार : कायदाविषयक स्थिती वाटते तेवढी चिंताजनक नाही, वृत्तपत्रांच्या गैरप्रचारामुळे पराचा कावळा होतो. आणि

पाच : १९७६–७७ च्या किंवा तत्सम कोणत्याही वर्षाच्या मानाने या वर्षभरातल्या गुन्ह्यांची संख्या बरीच कमी आहे. (जय जनता !)

नोकरशाहीच्या जुनाट, ठरीव साच्यातून निघालेल्या या पारंपारिक सरकारी खुलासेबाजीवर भाष्य करण्याची काही आवश्यकता आहे काय ?

आता राजकीय आणि जातीय हे गुन्ह्यांचे दोन्ही प्रकार वगळून जरी कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नाकडे पाहिले तरी काय दिसते ? व्यक्तिगत पातळीवरील किंवा संघटित गुन्हेगारीचे प्रमाणही कमी चिंताजनक नाही ! खुद्द राजधानीतील गुन्ह्यांचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर फुगत चालले आहे. शहराच्या अनेक विभागात संध्याकाळ झाल्यानंतर घराबाहेर फिरणे अशक्य झाले आहे. कारण अंधारात एकट्यादुकट्याला गाठून पैसे किंवा अब्रू लुटण्याचे प्रकार वाढले आहेत. चोप्रा भावंडांच्या खून–प्रकरणात दिल्ली आणि मुंबई पोलिसांनी आपला नाकर्तेपणा सिद्ध केला आहेच–जो पुण्याच्या पोलिसांनी जोशी–अभ्यंकर हत्याकांडाच्या शोधात आणि महाराष्ट्राच्या ग्रामीण पोलिसांनी मानवत हत्याकांडाच्या तपासात सिद्ध केला होता – हा मजकूर लिहिला जात असतानाही भर दुपारी मध्यवस्तीतून दोन छोट्या मुली पळवून नेण्यात आल्याचे प्रकरण पुण्यात गाजतंय् आणि गुन्हेगार इतक्या उजळ माथ्याने गुन्हे करण्याइतके शिरजोर कसे होऊ शकतात, याबद्दलचा अचंबा आणि नाराजी लोक–चर्चेतून व्यक्त होते आहे.

प्रांतोप्रांतीची परिस्थिती याहून फार वेगळी आहे असं नाही. पंजाबातल्या खदखदत्या असंतोषाचा उग्र स्फोट पुनश्च एकवार झाला आहे आणि अकाली दलाच्या पंजाबी मंत्रिमंडळाचाही गोंधळ उडालेला दिसतो आहे. काही राज्य सरकारांनी पक्षीय स्वार्थासाठी पोलीस दलाचा दुरुपयोग चालविल्यामुळे पोलिसांचे हात खऱ्या गुन्हेगारांपर्यंत पोचण्याआधीच दुबळे होत असल्याचा संशय उघडपणे व्यक्त करण्यात येतो आहे. गेल्या आठवड्यात (बहुधा)

गुरुवारच्या टाइम्समधलं लक्ष्मण यांचं या विषयावरचं मार्मिक व्यंगचित्र अद्याप वाचकांच्या स्मरणात असेलच. ' 'अंत्योदया 'मुळे गाजून राहिलेल्या राजस्थान सरकारचे हात, अशा तऱ्हेने पोलीस दलाला आणि एकंदर राज्ययंत्रणेला पक्षीय / राजकीय स्वार्थाचे लगाम घालण्यात गुंतल्याचं वृत्त–खरं असलं तर–निराशजनकच आहे. आपल्या राज्यात सर्वत्र 'आबादीआबाद ' आहे, असं दाखविण्यासाठी नवीच आकडेवारी तयार करण्याची टूम राजस्थान सरकारनं/वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी चालू केल्याचं दिसते. त्यामुळे विधानसभेत वा बाहेर शासनाच्याच अन्य खात्यांतर्फे पुरविण्यात येणारी माहिती आणि गृहखात्याचं 'स्वच्छ ' रेकॉर्ड यांच्यात तफावत पडल्याचं गंमतीदार दृश्यही क्वचित दिसतं. उदाहरणार्थ, प्रसिद्धी विभागाच्या माहितीपत्रकात हरिजनांवरील अत्याचार, हरिजन स्त्रियांवरील बलात्कार, दलितांना पूर्वी मिळालेल्या जमिनी बळानं हिसकावून घेण्याचे प्रकार यांना चांगलंच स्थान मिळालेलं आहे. तर पोलिसांच्या रेकॉर्डस्‌मध्ये अशा गुन्ह्यांची-विशेषत; हरिजन स्त्रियांवरील बलात्कारांची–वेगळी नोंद नसते म्हणे ! विशेष म्हणजे (स्वत: दलित–वर्गीय असणारे) राजस्थानचे गृहमंत्री संपत राम यांनी 'लिंक 'च्या प्रतिनिधीला काय सांगावं ? तर 'हरिजन स्त्रियांवरील बलात्कारांपैकी बहुसंख्य हे त्यांच्या संमतीनेच होतात–उच्चवर्णीय (पुरुष अर्थातच !) आणि दलित स्त्रिया यांतील 'असे ' संबंध काही नवे नाहीत (म्हणे)! ते प्रकाशात आले की (वृत्तपत्रांकडून ?) त्यांना बलात्काराचा रंग दिला जातो !' गृहमंत्र्यांचे हे घरगुती स्पष्टीकरण पटेल त्याला पटो ! जाता जाता एवढंच सांगायला हरकत नाही की, जुलै १९७७ ते जून १९७८ या 'जनता ' राज्याच्या पहिल्या वर्षाच्या काळात राजस्थानात एकंदर ६६, ८५६ गुन्हे घडले. (यात अर्थातच सर्व प्रकारच्या लहान–मोठ्या गुन्ह्यांचा समावेश होतो.) आणि हा आजवरचा उच्चांक आहे !

तरीही सर्वत्र सारं काही ऑलवेल आहे ! 'जनते 'चंच राज्य आहे ! आपण चाललो आहोत तरी कुठे ? या सगळ्याचा शेवट नक्की कुठे / कसा होणार आहे ? मुख्यमंत्रिपरिषदेजवळ या खऱ्या प्रश्नचिन्हांची उत्तरं आहेत काय ?

□

पोलिसांच्या असमर्थतेचं समर्थन करताना राज्यकर्ते वेळोवेळी, पोलीस दलाचे संख्याबळ पुरेसे नसल्याची तक्रार करीत असले, तरी वस्तुस्थिती अशी आहे की, पोलिसांची संख्या व एकूण लोकसंख्या यांचं प्रमाण ज्या देशांमध्ये चांगलं भक्कम आहे, अशा देशांत भारताचा समावेश होतो आपल्या देशाचं पोलीस दल हे आपल्या सैन्यदलापेक्षा संख्येनं जास्त आहे, ही गोष्ट अनेकांना ठाऊक नसेल ! आपल्या प्रहारक्षम–युद्धक्षम सैन्यदलाची एकत्रित संख्या आठ लाखांहून अधिक मानली जाते–(यात भूदल, वायुदल व नौदल या तिहींचा समावेश होतो)–तर केंद्रीय राखीव पोलिस व राज्य राखीव पोलिस यांच्यासह पोलीस दलाची एकंदर संख्या नऊ लाखांहून जास्त मानली जाते. त्यांच्याखेरीज रेल्वे सुरक्षा दल, सीमा सुरक्षा दल आणि मध्यवर्ती औद्योगिक सुरक्षा पथक यांच्या जवानांचीही संख्या भरपूर आहे. उदाहरणार्थ, नव्यानंच सुरू झालेल्या मध्यवर्ती उद्योगसुरक्षादलाची संख्यामुद्धा एव्हाना पाव लाखाच्या घरात गेली आहे आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, खाणी यांच्या सुरक्षिततेसाठी अधिकाधिक संरक्षकांची मागणी होते आहे. सीमा सुरक्षा दलाचा उपयोग गरजेनुसार राखीव पोलिसांप्रमाणेच करण्याचो प्रथा जुनीच आहे. १९७४ च्या देशव्यापी रेल्वे संपात या दलांच्या शस्त्रसज्ज जवानांचा भरपूर वापर (खरं तर निर्दय गैरवापर) केला गेला आणि तेव्हापासून उत्तम आधुनिक शस्त्रास्त्रांनी सज्ज असलेले हे जवान संरक्षणखात्याऐवजी गृहखात्याच्याच अखत्यारीत आले आहेत. लोकांचे मोठ्या प्रमाणावरचे लढे, दंगली मोडून काढण्यासाठी त्यांचा चांगला उपयोग होत असल्याने गृहमंत्रालयाचे फावले आहे.

या सर्वांचा परिणाम अर्थातच पोलीस दलावरील खर्चाचे आकडे बेफाम फुगत जाण्याकडे होतो. उदाहरणार्थ, १९७०–७१ मध्ये या खर्चासाठी सोडण्यात आलेली १०२ कोटींची रक्कम, पाचच वर्षांच्या कालावधीत दुपटीवर गेली आणि १९७७–७८ च्या अंदाजपत्रकात तर २२५ कोटी रुपयांची तरतूद त्यासाठी करण्यात आली. केंद्र सरकारचा हा पैसा राखीव पोलिस, सीमा सुरक्षा दल आणि केंद्रशासित प्रदेशांतील पोलिस यांच्यावरच बराचसा खर्च होतो, हे इथे लक्षात ठेवलं पाहिजे. आपापल्या राज्यांतील पोलीस दलाचा खर्चभार उचलणाऱ्या राज्यशासनांनीही नेत्रदीपक आघाडी मारली आहे. सहा वर्षांपूर्वी सर्व राज्यांचा एकत्रित पोलिस-खर्च होता २२७ कोटी रुपये. वाढता वाढता गेल्या वर्षी तो झाला ४२८ कोटी रुपये, दुपटीपेक्षा थोडासाच कमी. केंद्र व राज्य सरकारांचा सगळा खर्च एकत्र केला तर असे दिसते की, आजचा एकूण पोलिसी खर्च १९७०–७१ च्या मानाने १०९% वाढला आहे.

सुरक्षिततेच्या प्रमाणातही वाढ किती टक्के असेल ? आाही स्थितीत हा खर्च कमी पडतो म्हणून शासनांची कुरकूर एकीकडे चालू आहे आणि दुसरीकडे संसदीय अर्थव्यवहारसमितीने या खर्चावर प्रतिकूल शेरा मारला आहे. 'हा खर्च अशा टोकाला पोचला आहे की, जिथे विकास-योजनांसाठी ठेवावयाचा निधी सुरक्षितेसाठीच कुरतडला जातो आहे, ' या शब्दात, या चिंताजनक बाबीकडे समितीने संसद गृहाचे लक्ष वेधले आहे.

सर्वसाधारण पोलीस दलाचा हा व्याप कमी पडला म्हणूनच की काय, आणीबाणीच्या काळात 'सुपरकॉप ' या नव्या पथकाचा जन्म झाला आहे. कॉम्प्युटर व्यवस्थेची तिसरी पिढी म्हणून ओळखली जाणारी अपराधअन्वेषणशास्त्रातली ही अत्याधुनिक आणि महत्त्वाकांक्षी योजना, इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन या सार्वजनिक क्षेत्रातल्या उद्योगाने आखून तयार केली आहे. सर्वप्रथम १९७५ मध्ये 'मायक्रोकोड ' या नावाने ओळखली जाणारी साधनसामग्री तामिळनाडू सरकारने वापरात आणली. अमेरिकेत मुख्य कार्यालय असणाऱ्या एका बहुराष्ट्रीय कंपनीकडून साडेअकरा लाख रुपये खर्चून ही सामग्री खरेदी करण्यात आली होती आणि गुन्ह्याची नोंद झाल्यापासून काही मिनिटांच्या आत गुन्हेगारांना अटक करण्यासाठी किंवा संशयितांचा तलास लावण्यासाठी पोलिसांना या यंत्रणेची मदत होईल, असे सांगण्यात आले होते. आता अशा कॉम्प्युटर यंत्रणेचे विशाल राष्ट्रव्यापी जाळे उभारण्यासाठी ८ कोटी रुपये प्रारंभिक खर्चाची अधिक महत्त्वाकांक्षी योजना केंद्र सरकारनं आखली आहे. अमेरिकेतल्या अत्याधुनिक यंत्रणेवर आधारलेली ही योजना १९८० मध्ये पुरी होईल, तेव्हा आपल्या लाडक्या रक्षकांच्या–जनसेवक, लोकमित्र पोलिसांच्या–दातनखांना कॉम्प्युटरची इलेक्ट्रॉनिक धार प्राप्त होईल !

सद्य:स्थितीत प्रश्न एवढाच की या दात-नखांखाली चिरडले जातील ते नक्की कोण ? अपराधी की निरपराधी ?

□

'मी सांगतो तुम्हाला, प्लीज – तुम्ही जाऊ नका!'
'काय होईल गेलं तर?'
'अहो, ती बाई वस्कन तुमच्या अंगावर येईल! तुम्हाला दारातूनच घालवून देईल!'
'असं म्हणता?'
'तर हो! भयंकर बाई आहे ती. आधीच खाष्ट! त्यातून आता मुलगा गेल्यानंतर तर वेडीपिशीच झालीय्. म्हणून सांगतो, काहीही करा, पण त्यांच्याकडे जाऊ नका!'
'व्हॉट् डू यू मीन? आत्महत्त्या केलेल्या मुलाच्या प्रत्यक्ष आईला अजिबात न भेटता मी हा वृत्तांत लिहू?'
'एक्झॅक्टली. नाही तरी तुम्ही लेखक!–त्या बाईचा स्वभाव कल्पनेनं सहज लिहू शकाल तुम्ही!'
'लिहू शकेन; पण मला तसं शक्यतो करायचं नाही. आमच्या कल्पनाशक्तीपेक्षा वास्तव फार मोठं असतं. वेगळंही असतं – म्हणून!'
'काहीही म्हणा; पण तुम्ही त्या बाईला भेटलात तर अनवस्था प्रसंग ओढवेल! तुम्ही 'माणूस'साठी लिहिणार आहात, असं सांगितलंत तरी ते ती बाई ऐकून घेणार नाही. विशेषतः तुम्ही दुसऱ्या बाजूच्या लोकांना भेटेलाय्. त्यांच्यावर तिचा अति राग आहे म्हणजे पर्यायानं तुमच्यावरही!'
– मी या सल्ल्याचं तात्पर्य लक्षात घेतलं; पण या कथेतल्या ज्या सुनेचा छळ झाला, तिच्या सासूचीही बाजू ऐकल्याशिवाय मला चैन पडत नव्हतं.
मी त्यांच्या कुटुंबाच्या एका सन्मित्राला गाठलं. त्याला माझी अडचण सांगितली.
'उद्या सकाळी मी त्यांच्याकडे जाईन. तुम्ही नुसते माझ्याबरोबर या मित्र म्हणून! त्यांच्याकडे असेपर्यंत मी तुम्हाला 'अरे–तुरे' केलं तर चालेल ना?' तो म्हणाला.
सकाळी उठून आम्ही त्यांच्या घरी गेलो. ही वाडी–ही विहीर, ही ती तीन देवळं. हे देवीचं देऊळ. झाडांच्या कोंडाळ्यातलं. रात्री भयंकर वाटणारं. इथं तो येऊन बसायचा. रात्री दोन–दोन वाजता सिगरेट ओढीत.
घरात गेलो. 'नको–नको' म्हटलं तरी बाईंनी पोहे केले. चहा केला. ऑफिसला चाललेला धाकटा मुलगा आमच्यासाठी थांबला. इकड-तिकडच्या गप्पा चालल्या होत्या; पण मी गप्पच बसलो होतो.
'हा त्याचा फोटो.' भिंतीवरच्या एका प्रशस्त रंगीत छायाचित्राकडे बोट दाखवून ते गृहस्थ म्हणाले, 'गेल्या मे महिन्यात हा वारला!'
स्वारस्य न दाखविण्याचा प्रयत्न करीत मी गप्प बसून राहिलो.
– आणि जशा काही माझ्या मनातल्या विचारांच्या लहरी त्या बाईंपर्यंत पोचल्या. मी सर्वस्वी परका माणूस; पण माझ्याकडे पाहात त्या एकाएकी आपल्या मलाच सांगू लागल्या –
'आज षष्ठी. तिथीनं बरोब्बर एक वर्ष आणि चार महिने होतील तो गेला त्याला!'
– आणि त्या बाईंच्या डोळ्यांना धारा लागल्या.
या बाईंच्या छळाला कंटाळून तिचा मुलगा व सून यांनी जोडीनं आत्महत्येचा प्रयत्न केला, असं जे मला सांगण्यात आलं होतं, ते खरंच वाटेना.

प्रत्यक्ष घडलेल्या घटनेवर आधारित, संबंधितांच्या मुलाखती घेऊन लिहिलेली कादंबरी

# जोळ

## रत्नाकर मतकरी

प्रसिद्धी : माणूस दिवाळी अंक